

# दौलत

सन २०२४–२५

कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण द्वारा संचालित

## बाळासाहेब देसाई कॉलेज

पाटण, जि. सातारा



महिंद्रा प्राइड क्लासरूम प्रोजेक्टच्या समारोप
समारंभामध्ये मार्गदर्शन करताना
कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक
श्रीमंत याज्ञसेन पाटणकर व्यासपीठावर
उपस्थित मान्यवर



माननीय बाळासाहेब कोळेकर यांच्या
सत्कार समारंभामध्ये मार्गदर्शन करताना
श्रीमंत विक्रमसिंहजी पाटणकर
माजी बांधकाम व पर्यटन मंत्री महाराष्ट्र राज्य




डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम
वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने मार्गदर्शन करताना
मा. संजीव चव्हाण, संचालक को.ए.सो. पाटण



महिला दिनानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध
प्रबोधनकार मा. प्रा. वसंत हंकारे सर
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

# संपादन समिती

- **अध्यक्ष**
  डॉ. एस्. डी. पवार (प्राचार्य)

- **प्रमुख संपादक**
  सौ. पूर्णिमा मोरे

- **विभागीय संपादक**
  सौ. एस. पी. रोडे - मराठी
  कु. अर्चना साळुंखे - हिंदी
  सौ. पूर्णिमा मोरे- इंग्रजी
  कोमल पवार - विज्ञान
  श्री. रमेश शिर्के - अहवाल
  श्री. एस. जी. फुटाणे - तंत्रज्ञान सहाय्यक

- **मुखपृष्ठ संकल्पना**
  प्राचार्य डॉ. एस्. डी. पवार
  श्री. व्ही. एस. माथणे
  सौ. पूर्णिमा मोरे

- **छायाचित्रण**
  श्री. सुरेश संकपाळ
  (आराधना फोटो स्टुडिओ, पाटण)

- **मुद्रक : सप्तक प्रिंटींग सर्व्हिसेस, कोल्हापूर**
  २०३, ओमेगा टॉवर,
  राजारामपुरी ९ वी गल्ली,
  मेन रोड, कोल्हापूर.
  दूरध्वनी : ०२३१ - २५२२८२८

॥ ज्ञान दीपेन भास्वता॥

कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण द्वारा संचालित

## बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण (कनिष्ठ महाविद्यालय)

(कला, वाणिज्य, विज्ञान व उच्च माध्य. व्य. शिक्षण)
पाटण, ता. पाटण, जि. सातारा

- ISO 9001:2015 Certified College
- Junior College 'A' Grade
- केंद्र शासनाचा जिल्हास्तरीय 'स्वच्छ विद्यालय पुरस्कार' प्राप्त क. महाविद्यालय
- NAAC 'A+' Grade (4th Cycle) (CGPA-3.35)
- DST-FIST (O Level), DBT STAR College

# दौलत

वर्ष : छप्पन्नावे/ अंक : पंचावन्नावा / सन २०२४-२५




दौलत २०२३-२४



## आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व कोयना एज्युकेशन सोसायटीचे आधारस्तंभ

**पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार**
माजी केंद्रीय कृषी मंत्री, भारत सरकार

## पाटण तालुक्याचे भाग्यविधाते व कोयना एज्युकेशन सोसायटीचे आश्रयदाते, मार्गदर्शक

**मा. श्रीमंत विक्रमसिंहजी पाटणकर**
माजी सार्व. बांधकाम व पर्यटन मंत्री,
महाराष्ट्र राज्य



# कोयना एज्युकेशन सोसायटी

## पदाधिकारी, कुशल मार्गदर्शक



अध्यक्ष

मा. डॉ. सोपानराव चव्हाण



जनरल सेक्रेटरी

मा. श्रीमंत अमरसिंह पाटणकर



उपाध्यक्ष

मा. प्रकाशराव पाटील



जॉईंट सेक्रेटरी

मा. डॉ. सुहास देशमुख




**कुशल प्रशासक**
**मा. प्राचार्य, डॉ. एस्. डी. पवार**



संपादक मंडळ ''दौलत'' नियतकालिक : २०२३-२४

# अनमोल क्षण



स्वीप अंतर्गत जागो मतदार अभियान


बारावी शुभचिंतन कार्यक्रम मा. अॅडव्होकेट विजयकुमार सावंत सर


माजी विद्यार्थी मेळावा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



पर्यावरण जागृती विषयी श्री. एस. एल. पानस्कर सर मार्गदर्शन करताना


कॉपीमुक्त अभियान शपथ घेताना बारावीचे विद्यार्थी


विद्यार्थिनींना लाठी प्रशिक्षण देताना शितल देसाई मॅडम




रानभाजी महोत्सव विज्ञान मंडळ

## शिक्षक यशोगाथा (निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी प्राप्त)



**प्रा. शेखर फुटाणे**
केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण, सी.टी.ई.टी. परीक्षेत उत्तीर्ण



**श्री. सतीश गायकवाड**
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ. १२ वी परीक्षेच्या गोपनीय कामासंदर्भात नियुक्ती



**श्री. सत्यजीत माने**
SET (Maths)



**संजीवनी कुंभार**
SET (Maths)



**सौ. पुनम पाटील**
CTET Qualify



**सौ. पूर्णिमा मोरे**
२६१ लोकसभा विधानसभा निवडणूक नोडल ऑफिसर



**श्री. सुहास कांबळे**
Video Surveillance time पथक प्रमुख पाटण लोकसभा / विधानसभा



**श्री. बजरंग चव्हाण**
२६१ पाटण विधानसभा निवडणूक २०२४ भरारी पथक सदस्य

## आमचे गुणवंत - वर्गात प्रथम



**दिप्ती परीट**
११ वी कला



**सरिता शिंदे**
१२ वी कला



**विग्यात शेलार**
११ वी वाणिज्य



**प्राजक्ता कुंभार**
१२ वी वाणिज्य



**अमृता सुतार**
११ वी विज्ञान



**सिद्धी पाटील**
१२ वी विज्ञान



**सुनिता शिंदे**
११ वी BFSI



**अमृता शिर्के**
१२ वी BFSI

# आमचे गुणवंत - वर्गात प्रथम


प्रतिक कुंभार
११ वी इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी


सुजल कांबळे
१२ वी इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी


आशिष सावंत
११ वी हॉर्टिकल्चर


रोहिणी गुजर
१२ वी हॉर्टिकल्चर

# आमचे यशस्वी विद्यार्थी

## MHT - CET Result 2024

### PCM Group


महाडिक शिवानी धोंडिराम
९१.३२%


यादव यशराज जयकर
८६.९३%


जाधव वेदांत धोंडिबा
८६.४५%

### PCB Group


आर्डे दुर्गा रमेश
८३.६३%


थोरात ऋतुजा राजाराम
८३.२४%


पवार वैष्णवी रविकांत
८१.५९%


गुरव ऋतुजा दत्तात्रय
७६.५६%


गायकवाड आकांक्षा सतिश
७३.१७%


जमदाडे धनश्री मोहन
७२.८१%

# अनमोल क्षण



फूड फेस्टिवल



मोदक उपयोगिता



योग प्रात्यक्षिक



फूड फेस्टिवल दीपप्रज्वलन करताना श्रीमंत याज्ञसेनजी पाटणकर
संचालक को.ए.सो. पाटण



फूड फेस्टिवल दीपप्रज्वलन करताना मा. संजीव चव्हाण
संचालक को.ए.सो. पाटण




Multimedia center guidance lecture



E -Books - प्रदर्शन पाहणी करताना
मा. श्रीमंत याज्ञसेन पाटणकर

# कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. सोपानराव हणमंतराव चव्हाण | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. प्रकाशराव राजाराम पाटील | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्रीमंत अमरसिंह रणजितसिंह पाटणकर | जनरल सेक्रेटरी |
| ४. | मा. डॉ. सुहास अनंत देशमुख | जॉईंट सेक्रेटरी |
| ५. | मा. श्री. साहेबराव हंबीरराव देशमुख | संचालक |
| ६. | मा. श्री. शीलासिंग राजेमहाडीक | संचालक |
| ७. | मा. श्रीमंत याज्ञसेन विक्रमसिंह पाटणकर | संचालक |
| ८. | मा. श्री. संजीव सोपानराव चव्हाण | संचालक |
| ९. | मा. श्रीमंत ऋतुराज प्रतापसिंह पाटणकर | सदस्य |

कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण

# बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण (कनिष्ठ महाविद्यालय)

## शालेय व्यवस्थापन व विकास समिती

* प्रा. डॉ. एस. डी. पवार (प्राचार्य)
  अध्यक्ष, व्यवस्थापन समिती
* एस. एस. कांबळे (ज्येष्ठ शिक्षक)
  सचिव
* मा. संजीव चव्हाण
  संस्था, संचालक सदस्य
* श्री. विजय वसंत निकम
  सदस्य
* सौ. कल्पना विकास उलपे
  सदस्या
* सौ. सुनिता तुकाराम बेबले
  सदस्या
* सौ. संगिता संजय साळुंखे
  सदस्या
* सौ. नकुशा जयवंत मोहिते
  सदस्या
* सौ. व्ही. आर. शिर्के (समाजशास्त्र शिक्षक)
  सदस्या
* कु. के. आर. पवार (विज्ञान शिक्षक)
  सदस्या
* डी. एम. किरतावडे (गणित शिक्षक)
  सदस्या
* सौ. शोभा जयंत देवकर (आर्थिकदृष्ट्या दुर्बल)
  सदस्या
* श्री. विजय भास्कर खांडके
  सदस्य
* श्री. अनिल बनसोडे (समाजशास्त्र शिक्षक)
  सदस्य
* श्री. एस. ए. भोळे (कला शिक्षक)
  सदस्य

## दौलत : वार्षिक नियतकालिक – प्रकटन


भारत सरकारच्या प्रेस ॲन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट १९५६ च्या नियम क्रमांक ८ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती.

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | – | बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण |
| प्रकाशन काळ | – | वार्षिक |
| प्रकाशक | – | डॉ. एस्. डी. पवार, प्राचार्य |
| पत्ता | – | बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण |
| राष्ट्रीयत्व | – | भारतीय |
| प्रमुख संपादक | – | प्रा. सौ. पूर्णिमा मोरे |
| राष्ट्रीयत्व | – | भारतीय |
| पत्ता | – | आदित्यराज, ओम कॉलनी, कराड. दूरध्वनी : ९८२२४३०९६० |
| नियतकालिकाच्या मालकाचे नांव | – | कोयना एज्युकेशन सोसायटीचे, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण ता. पाटण जि. सातारा, दूरध्वनी : ०२३७२-२८३०४७ |
| मुद्रक | – | सप्तक प्रिंटींग सर्व्हिसेस |
| पत्ता | – | २०३, ओमेगा टॉवर्स, राजारामपुरी ९ वी गल्ली, मेन रोड, कोल्हापूर. दूरध्वनी : ०२३१-२५२२८२८ |
| राष्ट्रीयत्व | – | भारतीय |

मी, प्राचार्य डॉ. एस्. डी. पवार जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे खरी आहे.

स्थळ – पाटण
दिनांक : ३०/०६/२०२५

प्राचार्य, डॉ. एस्. डी. पवार,
प्रकाशक


या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. अंक फक्त खाजगी वितरणासाठी

# संपादकीय...



सहयाद्रीच्या डोंगररांगांमधून विस्तारलेले, संपूर्ण महाराष्ट्राला वीज पुरवठा करणारे शिवसागर धरण, महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून जिला ओळखले जाते ती 'कोयनामाई' आणि याच कोयनामाईच्या काठावर वसलेले पाटण शहर. याच निसर्गरम्य परिसरात १९६९ साली स्थापन झालेल्या 'कोयना एज्युकेशन सोसायटी'चे बाळासाहेब देसाई कॉलेज. डोंगराळ, दुर्गम व दऱ्याखोऱ्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उदात्त उद्देशाने स्थापलेले या महाविद्यालयाने गेल्या ५५ वर्षांत लाखो विद्यार्थी घडविले आणि खऱ्या अर्थाने पाटण हे विद्येचे माहेरघर ठरले.

जीवनात बऱ्याचवेळा संधी न मिळाल्यामुळे काही विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत नाही आणि अनेक कलागुणांनी संपन्न असलेला तालुका कलेला वाव मिळत नाही म्हणून दुर्लक्षित राहू नये याची जाणीव झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयामध्ये 'दौलत' नियतकालिकाची सुरुवात केली. विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ, एक विचारमंच स्थापन करून देण्यात आला. गेल्या ५५ वर्षांत अनेक कवी, लेखक, कथाकथनकार, कीर्तनकार नावारूपाला आले.

भावना जरी अमूर्त असल्या, त्यांना रूप-रंग नसले तरी, शब्दांनी त्याला मूर्त रूप देता येते. त्यासाठीचाच हा विचारमंच. इंद्रधनुष्याला जशा अनेक रंगाच्या छटा असतात तशाच विद्यार्थ्यांमध्येसुद्धा अनेक कला आविष्कारांच्या छटा असतात... रंगबिरंगी...! त्या साकारण्यासाठीचे व्यासपीठ.

इंद्रधनुष्य आणि माणूस या दोघांमध्ये एक साम्य आहे. दोघांमध्येही विविध प्रकारचे रंग असतात पण फरक एवढाच की इंद्रधनुष्याचे रंग डोळ्यांनी पाहता येतात आणि माणसांचे रंग अनुभवाने पाहता येतात. कथा, कविता, लेख या कलाविष्कारांच्या माध्यमातून. अशाच अनुभूती साकारण्यासाठीचे एक माध्यम म्हणजे 'दौलत' नियतकालिक.

दौलत नियतकालिकाचा कनिष्ठ विभागासाठीचा दुसरा अंक आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष मा. प्रकाशराव पाटील, जनरल सेक्रेटरी मा. श्रीमंत अमरसिंह पाटणकर, जॉईंट सेक्रेटरी मा. सुहास देशमुख, युवा संचालक मा. संजीव चव्हाण आणि मा. श्रीमंत याज्ञसेन पाटणकर तसेच इतर सर्व संस्था सदस्यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस्. डी. पवार यांचेही मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील उद्योन्मुख साहित्यिकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. या सर्वांचे हार्दिक आभार.

दौलत नियतकालिक शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा अंक प्रकाशित कराण्यासाठी आणि समृद्ध बनविण्यासाठी संपादक मंडळातील माझे सहकारी सौ. एस. पी. रोडे , कु. अर्चना साळुंखे, श्री. आर. के. शिर्के, प्राचार्य मा. श्री. सावंत सर, श्री. सत्यजित माने, श्री एस. ए. गायकवाड, कु. कोमल पवार आणि श्री. एस. जी. फुटाणे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. 'सप्तक प्रिंटींग सर्व्हिसेस' कोल्हापूरच्या मा. सौ. विजया पाटील व त्यांच्या सर्व सहकायांचे दौलत अंक वेळेत पूर्ण करण्यासाठी नेहमीच मोलाचे सहकार्य लाभते. हा ऋणानुबंध असाच कायम रहावा.

महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनातून आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून दौलतचा हा अंक अधिक सुंदर बनविता आला त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक हार्दिक आभार !

मला दौलत नियतकालिकासाठी प्रमुख संपादकीय होण्याचा बहुमान मिळाला. त्यासाठी योगदान देता आले हे माझे भाग्यच! हा अंक सुंदर व्हावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेले आहेत तरीही काही त्रुटी राहिल्या असल्यास प्रमुख संपादक या नात्याने मी त्याची संपूर्ण जबाबदारी घेते. येणाऱ्या भविष्यकाळात असेच अनेक साहित्यिक निर्माण होतील आणि आपल्या संस्थेचे आणि महाविद्यालयाचे आणि तालुक्याचे नाव उज्ज्वल करतील हा विश्वास आहे.

**सौ. पूर्णिमा राजेंद्र मोरे,**
**प्रमुख संपादक 'दौलत नियतकालिक'**

# मुखपृष्ठाविषयी...




'A book is judged by it's cover' कोणत्याही पुस्तकाचे मूल्यांकन मुखपृष्ठावरून केले जाते. चांगल्या आणि आकर्षक गोष्टीकडे आकर्षित होणं हा मानवी स्वभावधर्म आहे. तरीही मुखपृष्ठ आकर्षकच असून चालणार नाही तर त्यातून काहीतरी संदेश वाचकांपर्यंत पोहोचविता आला पाहिजे. मुखपृष्ठ हा नियतकालिकाचा महत्वाचा पैलू आहे. याच गोष्टीचा विचार करून आकर्षक सुंदर आणि संदेश देणाऱ्या मुखपृष्ठाचा विचार प्राधान्याने केलेला आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात नैसर्गिक गोष्टीचा विनाश होत चाललेला आहे. निसर्ग हाच मानवाचा प्रथम आणि खरा गुरु आहे. याच निसर्गाला आणि निसर्गातील जैवविविधतेला जतन करणं ही काळाची गरज आहे.' याच पार्श्वभूमीवर नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर आपल्या पाटण तालुक्यातील सुंदर नैसर्गिक दृश्यांचा समावेश आपण केलेला आहे आणि मलपृष्ठावर आपल्या कोयना एज्युकेशन सोसायटीमार्फत राबवल्या जाणाऱ्या 'धनेश पक्ष्याचे संवर्धन' या उपक्रमावर भर देण्यात आलेला आहे. आपल्या प्रगतीबरोबर निसर्गाचा ऱ्हास होणार नाही याची जबाबदारी आपण सर्वांनी घेणं ही काळाची गरज आहे. या जैवविविधतेचे संगोपन, संवर्धन व संरक्षण करणं ही जबाबदारी येणाऱ्या काळात सर्वांनी घ्यावी आणि निसर्गाकडे डोळसपणे पहावं हीच अपेक्षा....

# प्राचार्यांचे मनोगत...



'ज्ञान दीपेन भास्वता' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापन झालेली कोयना एज्युकेशन सोसायटी. १९६९ साली लावलेले शिक्षणाचे एक छोटेसे रोप आज ५५ वर्षांनंतर त्यांचे एका वटवृक्षामध्ये रूपांतर झालेले दिसते. Ignorance is the mark of mortality' अज्ञान हे मृत्यूचे लक्षण आहे. 'Wisdom is the mark of immortality' शहाणपण/ज्ञान हे अमरत्वाचे लक्षण आहे.

अज्ञानरूपी अंध:कारातून प्रकाशरूपी, ज्ञानरूपी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रकाशाची गरज असते आणि ही प्रकाशाची ज्योत म्हणजे 'बाळासाहेब देसाई कॉलेज.' सध्या महाविद्यालयामध्ये कनिष्ठ विभागाकडे कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय शिक्षण विभाग, कोयना ॲकॅडमी, इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट इ. विभाग कार्यरत आहेत. महाविद्यालयाची एकूण विद्यार्थी संख्या लक्षात घेता कनिष्ठ विभाग मोठा आणि नवनिर्मितीसम आहे हे लक्षात आल्यानंतर कनिष्ठ विभागासाठी स्वतंत्र 'दौलत' अंकाचे प्रकाशन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाविद्यालयाची प्रशस्त इमारत, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृह, कीडासंकुलाची भव्य, प्रशस्त व आधुनिक सुविधांनी सुसज्ज इमारत महाविद्यालयाचेच नव्हे तर संपूर्ण तालुक्याचे आकर्षण बनत आहे. महाविद्यालयामध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची व्यवस्था, गरम पाणी, फर्निचर या सुविधांसह (रास्त दरामध्ये) उपलब्ध आहे. महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये ४०००० पेक्षा जास्त ग्रंथ, पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत NCC व NSS च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय बांधिकालीचा विकास केला जातो. M.P.S.C. व पोलीस भरती केंद्र यासारखी स्पर्धात्मक परीक्षांची युनिट्स आपल्या महाविद्यालयात आहेत. आर्य चाणक्य केंद्रामार्फत इन्स्टिट्युट ऑफ हॉटोल मॅनेजमेंटच्या माध्यमातून Commi Chef नावाचा कोर्स नव्याने सुरू केलेला आहे. IT विभागामार्फत Junior software Developer, web Developer यासारखे कोर्स सुरू करण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून देणं हे उद्दिष्ट समोर ठेऊन महाविद्यानलयाने वाटचाल करत आहे.

विद्यार्थी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती, अंतर्गत तक्रार निवारण समिती, समुदेशन समिती यासारख्या समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. कमवा व शिका या योजनेमार्फत गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शैक्षणिक अध्यापनाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपताना दिसतात. याचाच एक भाग म्हणून ११ वी व १२ वी चे वर्षातून दोन + दोन असे चार पालक मेळावे घेतले जातात. विद्यार्थ्यांचे दिवाळीच्या सुट्टीत व उन्हाळी वर्ग घेतले जातात.

'दौलत' कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र अंक प्रकाशित करताना खूप आनंद होत आहे. नियतकालिकाच्या प्रमुख संपादक सौ. पूर्णिमा मोरे आणि त्यांच्या संपादक मंडळाने नियतकालिकाचा अंक दर्जेदार होण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे आधारवड, पाटण तालुक्याचे प्रतिभावंत व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व माजी मंत्री मा. श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर यांच्या खंबीर पाठबळावरच महाविद्यालय एवढी मोठी उंची गाठू शकेल. पाटण तालुक्यातील युवा नेते मा. सत्यजितसिंह पाटणकर यांची प्रेरणा तरुणांमध्ये चैतन्य निर्माण करत असते. आमचे मार्गदर्शक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष मा. प्रकाशराव पाटील जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संस्थेचे युवा संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर, मा. संजीव चव्हाण, सर्व संचालक व हितचिंतक, आजी-माजी विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक यांचे सहकार्य मिळाले आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद!

कनिष्ठ विभागातील संपादक मंडळाने हा अंक परिश्रमपूर्वक तयार केला आहे त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन! आपणा सर्वांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी खूप खूप शुभेच्छा !

**डॉ. एस. डी. पवार,**
**प्राचार्य, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण**

# भावपूर्ण श्रद्धांजली!



सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षात जागतिक,
राष्ट्रीय-राज्यस्तरावरील दिवंगत झालेले राजधुरंधर,
नेते, कलावंत, भारतीय सैनिक, शिक्षणतज्ज्ञ,
संशोधक, वैज्ञानिक, साहित्यिक, कोयना एज्यूकेशन सोसायटी परिवारातील
सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, देशभक्त, मान्यवर, विचारवंत, राजकारणी,
शास्त्रज्ञ, गायक, संगीतकार, नाट्य-चित्रपट अभिनेते, पहलगाम दहशदवादी
हल्ल्यात दिवंगत नागरिक व ऑपरेशन सिंदूरमध्ये शहीद झालेले भारतीय सैनिक
तसेच
अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्ती
- या सर्वांना...



# भावपूर्ण श्रद्धांजली

# मराठी विभाग



रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा ’!
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा!
सांगती ‘तात्पर्य माझे सारख्या खोट्या दिशाः
‘चालणारा पांगळा अन पाहणारा आंधळा‘
माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मीः
माझियासाठी न माझा पेरण्याचा सोहळा!

सुरेश भट (१९३२ ते २००३)

**– विभागीय संपादक –**

**सौ. शारदा पोपटराव रोडे**

# अनुक्रमणिका

## गद्य


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | संवाद एका सुसंस्कृत, दूरदर्शी आणि प्रगल्भ व्यक्तीमत्वाशी | ओंकार संतोष माने | बी.कॉम. भाग १ | मुलाखत | १७ |
| २ | सद्यस्थितीतील पर्यावरणीय समस्या | गोतपागर समिक्षा राहूल | १२ वी कला | माहितीपर | २४ |
| ३ | डॉ. रघुनाथ माशेलकर | गुजर समिक्षा संजय | ११ वी सायन्स | माहितीपर | २५ |
| ४ | मुलीचे आत्मकथन | साक्षी दत्तात्रय कवर | ११ वी सायन्स | आत्मकथन | २७ |
| ५ | आरोग्यदायी जीवनशैलीसाठी पर्यावरण संवर्धन | शिर्के श्रावणी निवृत्ती | ११ वी सायन्स | आत्मकथन | २९ |
| ६ | शाळा | सानिया पवार | ११ वी सायन्स | अनुभवात्मक | ३१ |
| ७ | पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा | आर्या आनंदा जाधव | ११ वी सायन्स | आत्मकथन | ३३ |
| ८ | डोना पोलामागील रहस्य | वसगडेकर सारा शशिकांत | ११ वी सायन्स | आत्मकथन | ३५ |
| ९ | सद्यस्थितीतील पर्यावरणीय समस्या | चेतना यशवंत सूर्यवंशी | ११ वी कॉमर्स | वैचारिक लेख | ३७ |
| १० | परिचय रायगडाचा | मनिषा भोसले | ११ वी सायन्स | वैचारिक लेख | ३९ |
| ११ | आयुष्य जगताना | ऋतुजा प्रवीण तांबे | १२ वी सायन्स | वर्णनपर | ४० |


## पद्य


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जाणता राजा | पायल जालिंदर कदम | १२ वी बँकिंग | २८ |
| २ | का ते मला कळेना | साईराज माने | ११ वी सायन्स | ३० |
| ३ | आयुष्य | परीट दीप्ती संदीप | १२ वी कला | ३२ |
| ४ | चहा आणि ती | सारा शशिकांत वसगडेकर | ११ वी सायन्स | ३२ |

# संवाद एका सुसंस्कृत, दूरदर्शी आणि प्रगल्भ व्यक्तीमत्वाशी

ओंकार संतोष माने, बी.कॉम. भाग १

**मुलाखत**



"पाटण तालुक्याचे उज्वल भविष्य आणि सुसंस्कृत नेतृत्व, पाटण पंचायत समितीचे माजी सभापती, स्वच्छ पाटण तालुक्याचे शिल्पकार, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान संचालक मा. सत्यजितसिंह पाटणकर (दादा) यांच्याशी ओंकार संतोष माने या बी.कॉम. भाग १ च्या विद्यार्थ्याने साधलेला मुक्त संवाद आणि त्यातून उलघडलेले त्यांचे दूरदर्शी आणि प्रगल्भ व्यक्तीमत्व."

**ओंकार : दादा, आपल्या बालपण विषयी काय माहिती सांगाल?**

**दादा** : माझं बरच बालपण पाटणमध्ये गेलेले आहे. मित्रांसोबत खेळण्यात... शेतावर जाण्यात व पाटणच्या लोकांच्यामध्ये राहून माझे बालपण गेले. माझे वडील आमदार असल्यामुळे पाटण तालुक्यातील लोकांची गाऱ्हाणी, दुःख, प्रश्न सोडविण्यात ते रमून जायचे. आणि मला पण त्यांच्या अडचणी चांगल्या पद्धतीने समजायला लागल्या आणि या लोकांच्यासाठी काहीतरी करण्याची उर्मी माझ्या बालमनामध्ये निर्माण झाली. माझा गणपती मंडळामध्ये सहभाग असायचा तसेच दिवाळीच्या वेळेला किल्ला करणे तसेच विविध खेळ खेळत बालपणीचा काळ खूप मजेशीर गेला.

**ओंकार : दादा आपला शैक्षणिक प्रवास कसा झाला?**

**दादा** : माझ्या शैक्षणिक प्रवासाबाबत सांगायचे झाले तर पुण्यामध्ये माझं शिक्षण झालं. सुरुवातीला पहिली ते चौथी विद्या भवन या कॉन्व्हेंट शाळेमध्ये होतो. त्यानंतरचे शिक्षण पाचवी ते बारावी शिवाजी मिलिटरी स्कूल मध्ये झाले.तिथेच मला शिस्तीचे धडे खूप चांगल्या पद्धतीने मिळाले व ते मला भावी जीवनात खूप उपयोगी पडले. त्यामुळे मी राजकारणात सुद्धा शिस्तीला आणि प्रामाणिकपणाला मी खूप महत्व दिले आहे. त्यानंतर माझं ग्रॅज्युएशन बी.एम.सी.सी. मध्ये झाले त्यानंतर मी पाटणला स्थायिक झालो.

**ओंकार : दादा, आपण सामाजिक कार्याकडे कसे वळलात?**

**दादा** : यशवंतराव चव्हाण साहेबांचे व पवार साहेबांचे राजकारण दादांनी जवळून पहिले होते. त्यांच्या ९०% समाजकारण आणि १०% राजकारण ही भूमिका मला त्याकाळात योग्य वाटली आणि तोच वसा मी पुढे घेतला. सुरुवातीपासून सामाजिक कार्याचा वारसा दादांच्या माध्यमातून असल्यामुळे गणपती उत्सव, शिवजयंती उत्सव, तसेच विविध सामाजिक कार्यक्रमामध्ये नेहमी सहभागी असायचो. खरे म्हणजे त्यामधूनच मला सामाजिक कार्याबद्दल आवड निर्माण होत गेली आणि मग पंचायत समितीच्या माध्यमातून राजकारणामध्ये काम करायला सुरुवात केली. राजकारण करत असताना समाजकार्याला जास्त महत्व दिले आणि अजूनही त्यादृष्टीने राजकीय व समाजकार्य



चालू आहे. आजही मी ९०% समाजकारण आणि १० % राजकारण यावर जास्त भर देत असतो.

**ओंकार : दादा, आपल्या पंचायत समितीच्या यशस्वी कारकिर्दीबाबत काय सांगाल?**

**दादा** : २००७ मध्ये मी म्हावशी गणातून पंचायत समितीची निवडणूक लढविली आणि भरघोस मतांनी निवडून आलो. सर्व पंचायत समिती सदस्य आणि पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मला सभापती पदाची संधी दिली. सभापती झाल्यानंतर नवीन काहीतरी करून दाखवले पाहिजे ही भावना समोर होती. पंचायत समितीच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले आणि ते पूर्ण सुद्धा केले. त्यावेळी निर्मल ग्राम योजना ही नवीन योजना आली होती. त्या योजनेच्या माध्यमातून आपला तालुका १००% निर्मल करण्याचा ध्यास मी घेतला आणि कामाला लागलो. आम्ही सर्वांनी प्रयत्न केला आणि पाटण तालुका ९४% निर्मल करून दाखवला. शालेय गुणवत्ता व शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत पहिली ते चौथी व पाचवी ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना राबविली यामुळे शाळांची स्पर्धात्मक वाटचाल सुरु झाली. पाटण तालुक्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, व्यवसाय व नोकरीच्या संधी याबाबत माहिती मिळावी, मार्गदर्शन व्हावे यासाठी तालुक्यातील नोंदणीकृत ग्रंथालयांना पंचायत समितीच्या सेस फंडातून १ लाख २५ हजार रुपयांची स्पर्धा परीक्षेची पुस्तके मोफत देण्यात आली. महिला व बालकल्याण विभागातर्फे १२ वी उत्तीर्ण मुलींना एम.एस.सी.आय.टी. चे प्रशिक्षण देण्यात आले. समाजकल्याण विभागाच्या सेस फंडातून शेतकऱ्यांना ताडपत्री, सायकल, कोळपी देण्यात आली.त्यावेळी सर्व सदस्यांनी चांगला प्रतिसादचनव्हे तर पुढाकार घेतला. त्यामुळे आम्हाला विविध योजना राबविण्यात यश मिळाले. त्यानंतर प्रत्येक गावामध्ये माती परीक्षण योजना राबवली. त्यामध्ये जवळपास ८५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी त्याचा फायदा घेतला. आपल्या शेतातील मातीचे परिक्षण करून मातीची माहिती घेतली व त्यामुळे कोणते पिक घ्यावे याबाबत त्यांना योग्य माहिती मिळाली. अशा काही योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे भाग्य आम्हाला मिळाले.

२००७ ते २०१२ या काळात सुरुवातीला ग्राम स्वच्छता अभियान, निर्मल ग्राम अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान, बळीराजा शेती सुधार योजना, शेतकऱ्यांसाठी सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता विकास, युवक विकास, आरोग्य अभियान, एकात्मिक महिला व बाल विकास, बचत गटांना अर्थ, पशुसंवर्धन विकास अशा अनेक योजना २००७ ते २०१२ या पाच वर्षात राबविता आल्या हे मला खुप आनंददायी वाटते. त्याच बरोबर संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्षपदी सुद्धा काम करण्याची संधी मिळाली आणि त्याचा फायदा लोकांना करून दिला.

**ओंकार : दादा, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे आपण संचालक म्हणून केलेल्या कार्याविषयी काय सांगाल ?**

**दादा** : जिल्हा बँकेच्या संदर्भात बोलायचं झालं तर ज्या सोसायटींचे ठराव होते त्यांच्या संचालकांनी अतिशय प्रामाणिकपणे कोणतीही अपेक्षा न बाळगता मला बहुमताने निवडून दिलं. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून नवीन वाहन खरेदी योजना, शेतकऱ्यांसाठी ट्रॅक्टर, ट्रेलर, अवजारे, पॉवर टिलर खरेदीसाठी कर्ज पुरवठा, विकास सेवा सोसायटीमार्फत दुचाकी वाहन कर्ज पुरवठा, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती विमा योजना, सोने तारण कॅश क्रेडीट कर्ज योजना, शेतकरी निवास योजना, कृषी पर्यटन तसेच शेळी व मेष पालन योजना अशा विविध प्रकारच्या योजनांमार्फत अनेक लोकांना विविध प्रकारचे लाभ देण्यासाठी आम्ही तत्पर आहोत. जिल्हा बँकेच्या माध्यमातून जो भूमिपुत्र आहे त्याला मोठ्या प्रमाणात आम्ही संधी उपलब्ध करून देत आहोत.

**ओंकार : दादा पाटण तालुक्यातील सहकार क्षेत्राविषयी आपली भूमिका काय ?**

**दादा** : यशवंतराव चव्हाण साहेबांनी सहकार चळवळ आणि स्थानिक स्वराज्य संस्था या दोन गोष्टींना प्राधान्य दिले. तोच वसा विक्रमसिंह पाटणकर दादांनी पाटण तालुक्यात तळागाळापर्यंत पोहचवला. विशेषतः खरेदी विक्री संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती, कोयना कृषक, कोयना ॲग्रो, पाटण अर्बन, पाटण तालुका दूध संघ, श्रीराम नागरी पतसंस्था, आत्ताचा पाटण

शुगर केन साखर कारखाना असेल अशा अनेक प्रोजेक्टमुळे लोकांना खूप फायदा झाला. पाटण तालुक्यात बाहेरचे फारसे उद्योग येत नसल्यामुळे पाटण तालुक्यामध्ये सहकारी तत्वावर अशा स्वरूपाचे उद्योग सुरु व्हावेत या भूमिकेतून विक्रमसिंह पाटणकर दादांनी प्रयत्न केले आणि त्याच दिशेने माझे सुद्धा प्रयत्न सुरु आहेत. सहकाराविषयी माझी भूमिका ही कायमच सकारात्मक राहिली आहे. या संस्था अधिक सक्षम बनल्या पाहिजेत या दृष्टीकोनातून माझे प्रयत्न सुरु आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अलीकडच्या काळात मी साखर कारखान्याची स्थापना केली. जेणेकरून शेतकऱ्यांच्या ऊसाला चांगला दर मिळाला पाहिजे ही त्यापाठीमागची भूमिका आहे. पाटण तालुक्यामध्ये दुध व्यवसाय हा शेतकऱ्यांचा जोडधंदा होता. दुधाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी पाटण तालुका दूध संघ सक्रीय आहे. तालुक्यामध्ये अनेक पतसंस्था आहेत त्यामाध्यमातून पाटण तालुक्यामध्ये सहकाराचे जाळे निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आणि ज्या बँका किंवा ज्या सहकारी संस्था उभ्या केल्या आहेत त्या-त्या संस्थेच्या संचालकांनी अतिशय चांगल्या प्रकारे सहकाराला चालना दिली आहे. ज्या ठिकाणी संधी मिळेल त्या ठिकाणी आम्ही सुद्धा त्यांना मार्गदर्शन करत असतो.

**ओंकार : दादा, समाजकारण आणि राजकारण करत असताना आपण एक यशस्वी उद्योजकही आहात या पाठीमागचे गमक काय ?**

**दादा :** राजकारण करत असताना आपल्याला आपला संसार सुद्धा उभा करायचा असतो त्यामुळे आपला खर्च आपण आपल्या खिशातून करावा या भावनेतून प्रत्येकाने व्यवसाय उद्योग केला पाहिजे आणि व्यवसायातून वेळ मिळेल तसे समाजकारण आणि राजकारण सुद्धा केले पाहिजे. शेवटी आपल्या तालुक्यातल्या तरुणाला आपल्या तालुक्यात रोजगाराची संधी उपलब्ध झाली पाहिजे त्या प्रयत्नातून तालुक्यात उद्योग आणण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. पाटण तालुका हा दुर्गम, डोंगराळ, भूकंपग्रस्त आणि पावसाळी असल्याने आपल्याला स्थानिक उद्योग उभे करून लोकांसाठी रोजगार उपलब्ध केला पाहिजे. त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे असा विचार करून पाटण तालुक्यामध्ये उपलब्ध होणाऱ्या गोष्टी कोणत्या? तर ऊसाची शेती, दुध, डोंगरी भागात पिकणारी फळे याचा उपयोग करून एखादे प्रोडक्ट निर्माण करता येईल का? हा विचार करू लागलो आणि मग सकस उद्योग समूह, कोयना अग्रो इंडस्ट्रीज निर्माण झाली. आता पाटण शुगरकेन साखर कारखाना सुरु केला आहे. कोयना ॲग्रो मुळे अनेक सुशिक्षित, अशिक्षित बेरोजगार महिलांना-पुरुषांना रोजगार मिळाला. फळापासून बनविलेली पेय,जाम, लोणची अशा पदार्थांना आज मागणी वाढताना दिसत आहे. सकसच्या दुध आणि दुग्धजन्य पदार्थ तसेच आईस्क्रीमने बाजारपेठेत नावलौकिक मिळविला आहे. सकसने शेतकऱ्यांना गाई-म्हैशी खरेदीसाठी बँकेच्या मार्फत कर्ज पुरवठा केला आणि यातूनच हा प्रकल्प प्रगती पथावर आहे या सकस उद्योग समूहाच्या माध्यमातून शेकडो युवक, वाहन चालक - मालक विक्रेते यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.तसे पहिले तर प्रकल्प निर्मिती करताना शेतकरी, व्यापारी व युवावर्ग व पर्यायाने तालुक्याचा विकास हे ध्येय ठेवून आजवर काम करत आलो आहे. त्याचा फायदा असा झाला की, कोयना अग्रो,सकस आदी प्रकल्पामधील प्रगती आणि त्यामधून शेकडो लोकांना मिळालेला रोजगार हे मला जास्त महत्वाचे वाटते.आणि माझ्या यशस्वितेचे गमक सांगायचे झाले तर प्रामाणिकपणे काम करणे आणि नाविन्याचा ध्यास घेऊन कठोर परिश्रम करणे हेच मी आयुष्यभर पाळत आलो. जीवनात कोणताही शॉर्टकट वापरला नाही.

**ओंकार : दादा पाटण तालुक्यामध्ये अजून कोणते नवीन प्रोजेक्ट यावेत असे आपणास वाटते?**

**दादा :** पाटण तालुक्यामध्ये नवीन प्रोजेक्ट संदर्भात बोलायचे झाले तर भूकंपग्रस्त तालुका असल्याने नवीन प्रकल्प निर्माण होण्यास थोडी अडचण होत आहे. पण आम्ही कधीच थांबलो नाही आपल्या तालुक्यातील तरुण उद्योजक बनावेत, व्यवसायिक बनावे म्हणून आदरणीय विक्रमसिंह पाटणकर दादांनी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्यामार्फत तालुक्यामध्ये एम.आय.डी.सी.ची उभारणी केली. पर्यटन विकासाला

चालना देण्यासाठी बोटिंग चालू केले होते. पवनचक्की प्रकल्प, नेहरूउद्यानाची निर्मिती केली. आजच्या पर्यटनाविषयी बोलायचं झालं तर तालुक्यांमध्ये अनेक नवीन प्रोजेक्ट करण्यासारखे आहेत. पाटण तालुका हा पर्यटनपूरक, निसर्गाने भरभरून वरदान दिलेला आहे. सडावाघापूर, वनकुसवडेचे विस्तीर्ण पठार, कोयना धरणासह अनेक पर्यटन स्थळे, यासह डोंगरावरून कोसळणारे अनेक धबधबे आहेत. याठिकाणी स्थानिक लोकांना रोजगार-व्यवसायाच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. अशा ठिकाणी पर्यटकांना शासनाने जर प्राथमिक सोई, सुविधा उपलब्ध करून दिल्या तर पर्यटनस्थळे तर विकसित होतील सोबत स्थानिक लोकांना रोजगार सुद्धा उपलब्ध होऊ शकेल.

पाटण तालुक्यामध्ये विविध तीर्थक्षेत्रे आहेत. चाफळचे राम मंदिर, रामघळ, येडोबा देवस्थान, नाईकबा देवस्थान, जानाई देवस्थान, धारेश्वर देवस्थान, रुद्रेश्वर देवस्थान अशा धार्मिक स्थळांचा विकास झाला तर पर्यटन वाढू शकेल. पाटण तालुक्यामध्ये लहान मोठी धरणे आहेत त्यामाध्यमातून मत्स्य व्यवसाय करता येवू शकतो. योग्य नियोजन केले तर त्या धरणामध्ये वॉटर स्पोर्ट सुद्धा सुरु करू शकतो. पश्चिम घाटात दुर्गम व डोंगरमाथ्यावर मोठ्या प्रमाणात पडीक क्षेत्र असून या क्षेत्राचा वापर करून ठिकठिकाणी शेततळी घेतल्यास त्यात लाखो लिटर पाणी साठविले जावू शकते. त्या माध्यमातून शेतकऱ्यांना वनशेती, सुगंधी वनस्पती किंवा औषधांची शेती, फळझाडे लागवड करून आपल्या शेतीसह पिण्याच्या पाण्याबरोबर मच्छीपालनसारखे व्यवसायही करता येवू शकतात. वास्तविक पाहता माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर दादा यांच्यावर सन १९९९ ते २००४ या काळात सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी होती. त्यावेळी शेवटच्या काही महिन्यात पर्यटन खात्याचीही जबाबदारी देखील त्यांच्याकडे आली होती. त्याच दरम्यान आपण सर्वांच्या हिताच्यादृष्टीने नवीन महाबळेश्वर प्रकल्पाला मंजुरीही दिली होती. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या माध्यमातून शासनाच्या तब्बल साडेतीन हजार एकर क्षेत्रावर हा प्रकल्प नियोजित आहे. या प्रकल्पामध्ये पर्यटनासह अगदी साहसी खेळ, वैद्यकीय महाविद्यालये, वनस्पती उद्यान जपणूक केंद्र, थीम, जॉगर्स पार्क, हेल्थ क्लब, अध्यात्मिक केंद्र, पॅराग्लायडिंग, ट्रेकिंग, हॉटेल्स व रिसॉर्ट्स, पक्षी अभयारण्य, जलक्रीडा ते अगदी रेल्वे, हवाई अड्ड्यांचा देखील यात समावेश करण्यात आला आहे. नवीन महाबळेश्वर प्रकल्प हा निश्चितच सातारा जिल्ह्यातील पर्यटनवाढीसाठी सर्वात मोठे माध्यम ठरेल. या प्रकल्पाचा फायदा पाटण, जावळी, महाबळेश्वर, सातारा तसेच संपूर्ण जिल्ह्याला होईल.

**ओंकार : दादा तालुक्यात धरणाची अनेक कामे होऊनही त्याचा लाभ मात्र शेतकऱ्यांना फारसा मिळाला नाही याबाबत आपले मत काय?**

**दादा :** पाटण तालुका हा प्रामुख्याने पावसाळी तालुका आहे. आणि या पावसाच्या पाण्याचा उपयोग वर्षभर कसा करता येईल यादृष्टीने विक्रमसिंह पाटणकर दादांनी शेतीच्या पाण्यासाठी पाटण तालुक्यामध्ये लहान मोठे सात प्रकल्प उभे केले.त्यामध्ये तारळी नदीवर तारळी धरण, ढेबेवाडी भागात वांग नदीवर धरण, मराठवाडी येथील धरण, मणदुरे विभागात निवकणे धरण, चिटेघर धरण, बीबी धरण अशा वेगवेगळ्या धरणामुळे हरितक्रांती झाली आहे. अगोदरच कोयना धरणामुळे पाटण तालुका देशात प्रसिद्ध झाला आहे आता नव्या धरणांमुळे तालुक्याचे नंदनवन होणार असून धरणांचा तालुका म्हणून पाटण तालुक्याला नावलौकिक प्राप्त झाल्याने मनापासून आनंद होत आहे. या सात प्रकल्पापैकी तीन प्रकल्प ८० टक्के पूर्ण झाले असून बाकी सर्व प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. चाफळचे धरण, मराठवाडीचे धरण, ढेबेवाडीचे धरण, तारळी धरण, मोरगिरी धरण अशी धरणे झाल्यामुळे १२ महिने नद्यांना पाणी वाहत आहे. जरी शासनाने पुढच्या योजना केल्या नसल्या तरी शेतकऱ्यांनी आपली स्वतःची मोटर नदीवर बसवलेली आहे व सरकारची वाट न बघता आपल्या शेतीला पाणी घेऊन जाण्याचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने केलेले आहे.दादांनी सातत्याने धरणामधून बंदिस्त पाईपलाईनची मागणी केली आहे. त्याचा पाठपुरावा करण्यास मी प्राधान्य

देणार आहे.

**ओंकार : आज पाटण तालुक्यामध्ये जंगली प्राण्यांचा त्रास शेतकऱ्यांना होत आहे त्याबद्दल आपली भूमिका काय?**

**दादा :** तालुक्यात व्याघ्र प्रकल्पामुळे अनेक गावे बाधित झालेली आहेत. वन्यप्राण्यांच्या त्रासाला कंटाळून अनेक लोक आपली घरेदारे सोडून गेली आहेत व अजूनही जात आहेत. वन्यप्राण्यांच्यामुळे शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत असून वन्यप्राण्यांचे मानवावरील हल्ले वाढले आहेत. आजपर्यंत अनेक जणांना आपला जीव गमवावा लागला असून त्यांनाही नीटपणे मदत मिळालेली नाही. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत आहे. वन्य प्राण्यांपासून त्यांना व त्यांच्या शेतीला संरक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्ही प्रत्येक वेळी संघर्ष केलेला आहे. मोर्चे काढले आहेत, आंदोलने केली आहेत. सगळ्या वरिष्ठ मंडळींना सुद्धा आम्ही भेटलो आहोत. गेले दहा पंधरा वर्षे आमचा हा लढा चालूच आहे. या लढ्यात शासनाकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई जलद आणि बाजार भावाप्रमाणे मिळावी असे आमचे प्रयत्न चालू आहेत. शेती करता येत नसल्यामुळे लोक मुंबई पुण्याला कामाला जात आहे. आपण जर खेड्यापाड्या.. गावामध्ये गेलो तर जवळपास त्या गावांमध्ये ५०% घरांना कुलूप लावलेले आहेत. या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आमचा प्रयत्न कायम चालू आहे आणि कायम चालू राहील. पर्यावरण आणि वन्यजीव संतुलन याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचासुद्धा विचार शासनाने करणे आवश्यक आहे. ज्याठिकाणी लोकांच्यावर अन्याय होताना दिसत असेल त्याठिकाणी आम्ही त्यांना मदत करण्यास सदैव तत्पर आहोत.

**ओंकार : दादा पाटणच्या पर्यटन विकासासाठी आपली भूमिका काय ?**

**दादा :** पर्यटन हा जागतिक पातळीवरील मोठा व्यवसाय आहे. पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांवर अनेकांचा उदरनिर्वाह चालू शकतो. वाहतूक, हॉटेल्स, लहान लहान टपऱ्या सुद्धा पर्यटन व्यवसायाशी जोडल्या गेल्या आहेत.पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विषयक विकास होण्याबरोबरच पर्यटनस्थळ परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनमानातही बदल घडून येतो. पर्यटकांना आवश्यक असणारी निवास, भोजन, वाहतूक, माहिती, मनोरंजन आदी व्यवस्थेसोबतच त्या भागातील उत्पादनांनादेखील मागणी निर्माण होते.

पावसाळी पर्यटनासाठी पाटण तालुक्यात येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.पाटणला नैसर्गिक, ऐतिहासिक, पौराणिक, भौगोलिक असे विविधांगी पर्यटनवैभव लाभले आहे. पाटण तालुक्यात जंगले, पुरातन गडकिल्ले, गुंफा, मंदिरे, धबधबे, वन्यजीव असे पर्यटन वैविध्य असून हे राज्यभरापर्यंत पोहोचविण्यासाठी सामुहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण या पर्यटनामुळे येथील लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. पाटण तालुक्यात जर पर्यटना संबधी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. तर यातून राज्यभरातील पर्यटक पाटण तालुक्याकडे आकर्षित होतील आणि त्याद्वारे पर्यटनविकास होऊन रोजगार निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. अगदीच सांगायचे झाले तर सडावाघापुरचा उलटा धबधबा आणि कोयनेचा ओझर्डे धबधबा तर राज्यात प्रसिद्ध आहे. सुंदरगड, चाफळचे राम मंदिर, कोयना भागातील रामघळ, रामबाण, प्राचीन पांडव मंदिर, घाटमाथा धबधबा अशी किती तरी पर्यटन स्थळे पाहण्याजोगी आहेत. फक्त गरज आहे ती सकारात्मक दृष्टीने पर्यटनाकडे पाहण्याची आणि पर्यटन हा व्यवसाय म्हणून स्वीकारण्याची. म्हणजे रोजगारासाठी मुंबई पुण्याकडे जाणारा तालुक्यातील तरुणांचा लोंढा काही प्रमाणात थांबविता येईल.

**ओंकार : दादा पाटण तालुक्यातील कार्बन क्रेडिट संबंधित शेतकरी प्रबोधन कार्यक्रम राबवले पाहिजेत याबाबत आले काय मत आहे ?**

**दादा :** नक्कीच याबाबत शेतकरी प्रबोधनपर कार्यक्रम राबविलेच पाहिजेत आणि कार्बन क्रेडीट बद्दल सांगायचे तर पाटण तालुक्यामध्ये शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिट मिळालेच पाहिजे या मताशी मी ठाम आहे. परंतु त्याबद्दल जनजागृती होणे आवश्यक आहे. कार्बन क्रेडिट किंवा ट्रेंडिंगचा सरळ अर्थ हवेतील कार्बनचा

व्यापार करणे होय. कार्बन क्रेडिट ही आंतरराष्ट्रीय उद्योगात कार्बन उत्सर्जन नियंत्रण योजना आहे. या माध्यमातून कार्बन उत्सर्जन नियंत्रित केले जाते. याला प्रोत्साहन देण्यासाठी त्यास मुद्रेशी जोडण्यात आले आहे. कार्बन डायऑक्साइड आणि ग्रीन गॅसेसचे उत्सर्जन कमी करण्यासाठी क्योटो करारात २ मार्ग सुचविले आहेत. त्यापैकी विकसित देशांनी कमी प्रदूषण करणारे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी त्यात पैसा गुंतवावा. अन्यथा बाजारातून कार्बन क्रेडिट खरेदी करावे. त्यामुळे जो शेतकरी आपल्या बांधावर व शेतामध्ये वर्षानुवर्षे जे झाड जपतोय... वाढवतोय त्याला कार्बन क्रेडिट मिळालंच पाहिजे हे आमचं धोरण आहे. उद्योजकांना कार्बन क्रेडिट लवकर मिळतं मात्र सर्वसामान्य शेतकऱ्यांना सुद्धा या कार्बन क्रेडिटचा लाभ मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांनी इथल्या जुन्या जाणत्या लोकांनी हे पाटण तालुक्यातील जंगल .. वन संपत्ती वर्षानुवर्षे जपली आहेत. ज्यांनी आपल्या शेतामध्ये झाडे लावलेली आहेत. त्यांनी झाडांचे रक्षण केलेले आहे त्या सर्वांना कार्बन क्रेडिट मिळालं पाहिजे. यासाठी आम्ही लोकांना त्याबद्दल माहिती देत आहोत. त्यासाठी पूरक कार्यक्रम राबवीत आहोत. किती लहान शेतकरी असला तरी तो कार्बन क्रेडिट पासून वंचित राहिला नाही पाहिजे. शेतकऱ्याच्या झाडाच्या उंची प्रमाणे झाडाच्या वयाप्रमाणे त्याला कार्बन क्रेडिट हे मिळालं पाहिजे यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. त्याचबरोबर शेततळी, वनतळी बांधण्यासाठी शासनाने अनेक योजना जाहिर केल्या आहेत. त्या शेतकऱ्यांच्या फायद्याच्या योजना दुर्गम डोंगराळ भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. भौगोलिकदृष्ट्या परिसराचा अभ्यास करून शेतकऱ्यांना याबाबत जेवढी माहिती देता येईल तेवढे आम्ही देत आहोत. शेतीपूरक योजनांचा लाभ हा शेतकऱ्यास मिळाला तर त्याच्यापदरी फायदा होवून उत्पन्न वाढेल असे मला वाटते. कार्बन क्रेडिट ट्रेडिंगच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते.

**ओंकार : दादा तालुक्यातील जनतेवर अनेक जाचक अटी लादल्या जात आहेत याबाबत आपले मत काय ?**

**दादा** : मानवाप्रमाणेच इतरही पशु पक्ष्यांना जीवन जगण्याचा अधिकार आहे यासाठी शासनाने वन्यजीव संरक्षण कायदा केला आहे. मात्र आता शेतकरीच असुरक्षित झाला असून शेतातील पिके आणि त्याच्या पाळीव जनावरांच्यावर होणारे वन्य प्राण्याचे हल्ले यामध्ये शेतकरी सापडला आहे. आज पाटण तालुक्यामध्ये व्याघ्र प्रकल्प, इकोसेन्सेटिव्ह झोन, कोअर व बफर झोनमुळे हजारो हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. आणि आता कंजर्वेशन झोनमुळे शेतजमीन, उद्योग धंदे, पर्यटनाचे प्रकल्प असे अनेक प्रोजेक्ट बाधित होणार आहेत. याचा परिणाम स्थानिक भूमिपुत्रांच्या आर्थिक, सामाजिक, सगळ्याच गोष्टीवर होणार आहे. तालुक्यातील या विविध प्रकारच्या झोनच्या जाचक अटीमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, शेती आणि पारंपरिक व्यवसायावर बंधने येवू लागली आहेत. मला असे वाटते की, अटी लावत असताना शासनाने पहिल्यांदा शेतकऱ्यांना व स्थानिक लोकांना विश्वासात घ्यावे. मग अटी लावाव्यात जेणेकरून अटी लावल्यानंतर पुन्हा शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्याचे सुद्धा नुकसान होते आणि शासनाचे सुद्धा नुकसान होते. त्यामुळे अटी लावण्याआधी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन अटी लावण्यात याव्यात. नियम असावेत पण ते नियम माणसाच्या जीवावर येवू नये याची काळजी घेतली जावी. आमची याठिकाणी हीच मागणी असणार आहे की ज्या अन्यायकारक जाचक अटी लादल्या जात आहेत त्याचा शासनाने गंभीरपणे विचार करून शेतकऱ्यांच्यावर इथल्या भूमिपुत्रांवर अन्याय न होता जे करता येईल त्यासाठी आमचा प्रयत्न चालू आहे.

पाटण तालुक्यामध्ये होणाऱ्या कोणत्याही प्रोजेक्टला आमचा विरोध नाही मात्र हा प्रोजेक्ट होत असताना आमच्या तालुक्यातील लोक त्यामुळे विस्थापित होणार नाहीत हे महत्वाचे आहे. एखादे धोरण ठरवीत असताना स्थानिक लोक आणि सामाजिक संस्था यांच्याशी विचारविनिमय होणे आवश्यक आहे. लोकांना त्या प्रकल्पाचे फायदे आणि तोटे याची माहिती देवून मगच यावर निर्णय घेतला जावा.

**ओंकार : दादा आजच्या शिक्षणाविषयी आपले मत काय?**

**दादा** : आजच्या शैक्षणिक धोरणाविषयी सांगायचे झाले तर शासनाने धोरण ठरवीत असताना शहरी विद्यार्थ्यांबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा विचार करणे आवश्यक आहे. दुर्गम, डोंगराळ भागातील पालकांना व विद्यार्थ्यांना याचा कसा फायदा होईल हे लक्षात घेतले पाहिजे. पाटण तालुक्याचा विचार केला तर माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर दादा यांच्या माध्यमातून गाव दुर्गम भागात सुद्धा शाळा सुरु करण्यात आल्या पण दुर्दैवाने यातील काही मराठी शाळा बंद होत आहेत मग त्या गावातील मुलांनी शिकायचे कुठे? हा प्रश्न आहे. ग्रामीण मुलांना दर्जेदार शिक्षण मिळालं तरच ही मुलं शहरातल्या मुलांशी स्पर्धा करू शकतात. आज तालुक्यामध्ये ज्या काही शिक्षणाच्या सोयी आहेत त्यांचा दर्जा अजून वाढावा.तालुक्यातील मुलांना उच्चशिक्षणासाठी बाहेर जावे लागू नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

**ओंकार : दादा पाटण मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले व्हिजन काय?**

**दादा** : पाटण मतदारसंघ हा आदर्श असला पाहिजे. आदर्श मतदारसंघ म्हणजे आपल्या तालुक्यातील तरुणाला आपल्या तालुक्यातच रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी आम्ही विविध कंपन्यांना भेटून नवीन उद्योग कसे येतील यासाठी प्रयत्न करीत आहोत याचाच एक भाग म्हणून आपण नुकतेच ऑटोमोबाइल क्षेत्रातील नामांकित कंपनीचे सर्विस सेंटर पाटण मध्ये सुरु करत आहोत. तालुक्यातील मुलांना उच्च दर्जाचे व गुणवत्तापूर्ण शिक्षण तालुक्यातच मिळाले पाहिजे. पाटण तालुका हा शैक्षणिक संकुल म्हणून नावारूपास आला पाहिजे त्यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. पाटणमध्ये व्यावसायिक कोर्सेस कसे सुरु होतील याकडे आमचे पूर्ण लक्ष आहे. आम्ही हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज सुरु केले आहे. त्यामार्फत अनेक विद्यार्थी नोकरीला लागले आहेत. लवकरच आम्ही नर्सिंग कोर्सेस सुरु करणार आहोत. त्याच बरोबर कौशल्य विकासच्या आधारावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याचा मानस आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या जगात आपला विद्यार्थी कुठेही कमी पडू नयेत यासाठी आपण बी.सी.ए. आणि बी.कॉम.आय.टी. सारखे कोर्स सुरु केले आहेतच. आता एम.सी.ए. आणि एम.कॉम. आय.टी. सारखे कोर्स नवीन सुरु करणार आहोत. पाटण तालुका हा शिक्षण, उद्योग, साहित्य, क्रीडा, सामाजिक कार्यात अग्रेसर झाला पाहिजे या दृष्टीने पाटण तालुक्या बाबतीत माझं व्हिजन आहे ...

**ओंकार : दादा आजच्या पिढीला विद्यार्थ्यांना आपण काय संदेश द्याल.**

**दादा** : आजच्या युवा पिढीने कोणतेही काम करत असताना आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा वापर करावा. विज्ञाननिष्ट विचार करत असताना आपल्या संस्कृतीचा विसर पडू देवू नये. एक गोष्ट मात्र खरी टी. व्ही., इतर प्रसिद्धी माध्यमे, मोबाईल फोन, सोशल मीडिया आदींमुळे आजच्या विद्यार्थ्यांचे विश्व विस्तारत आहे. मात्र अर्धवट माहिती आणि ज्ञानाच्या आधारे दिशाभूल झालेल्या तरुणांची मोठी फौज तयार होण्याचा धोका आहे. प्रत्यक्ष जीवन आणि आभासी जग यामधील फरक शिक्षक व पालकांनी वेळीच विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे. मैदानावर खेळण्याच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात याव्या. सर्व इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसेस यांचा वापर मर्यादित प्रमाणात गरज असेल तेव्हाच करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

पाटण तालुक्यातील विद्यार्थ्यांना माझे सांगणे आहे की, त्यांनी संशोधन क्षेत्रात काम करावे म्हणजे विद्यार्थ्यालाही फायदा होईल आणि तालुक्याला सुद्धा त्याचा उपयोग होईल. तुम्ही ज्या ठिकाणी नोकरीसाठी जाल त्या ठिकाणी एक लक्षात ठेवलं पाहिजे की प्रामाणिकपणे आपले काम आपल्याला यश मिळवून देणार आहे. कष्टाशिवाय पर्याय नाही आणि प्रामाणिकता पुढील आयुष्यामध्ये जपली पाहिजे. भविष्यामध्ये पाऊल ठेवाताना आपल्या आई-वडिलांची सेवा आणि शिक्षकांचा आदर ठेवावा एवढेच मी युवा पिढीला सांगू इच्छितो. धन्यवाद !

**ओंकार : धन्यवाद दादा !!**

# सद्यस्थितीतील पर्यावरणीय समस्या

गोतपागर समिक्षा राहूल, १२ वी कला

माहितीपर



"पर्यावरण ही एक समस्या आहे. या समस्येत कारणीभूत मानून आणि निसर्ग हे घटक आहेत. मानव हा बुद्धिमान प्राणी आहे. त्याने आपल्या जीवनासाठी पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे".

कसा घेऊ
मी स्वच्छंद श्वास???
पसरला चहुकडे धूरच धूर
घाण पाण्याचा पूरच पूरः
"फाटतोय थर हा ओझोनचाही
रोगराई इकडे पण सुख नाही"

उगवणारा दिवस मानवा पुढे नवनव्या समस्या निर्माण करत असतो. पण या विसाव्या शतकाच्या अखेरीस पृथ्वीपुढे जी समस्या निर्माण झाली आहे, त्यामुळे हा पृथ्वीपुत्र हादरून गेला आहे. नेहमीप्रमाणे मानवापुढील ही समस्या मानवानेच केली आहे. त्यानेच आपल्या पृथ्वी मातेला संकटात ढकलले आहे. खरे पाहता, मानव आणि निसर्ग ही दोन्ही वसुंधरेचीच लेकरे- निसर्गाच्या कुशीतच मानव मोठे झाले. आपला विकास साधण्यासाठी त्याने याच निसर्गाचा आधार घेतला आदर्श ठेवला. निसर्गातच त्याने आपले घरकुल निर्माण केले. उंच उंच आभाळाला जाऊन भिडणारी वृक्षराजी पाहून माणसाचे आकाशाकडे लक्ष गेले. आभाळात स्वच्छंद भरारी मारणाऱ्या विहगाकडे पाहून माणसाचे लक्ष आकाशाकडे गेले.

त्यालाही आकाशात विहार करावासा वाटू लागला. निसर्गाबरोबर सुखात रमलेल्या या माणसांच्या स्वार्थी वृत्तीला पंख फुटले. स्वतःच्या बुद्धिमत्तेचा गर्व झालेला हा माणूस दूरवरचा विचार न करता भोवतालच्या निसर्गाचा नाश करू लागला आणि त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला. माणसाने आपल्या बुद्धीमध्ये औद्योगिक क्षेत्रात खूप प्रगती साधली आहे. स्वतःच्या यशाने धुंद झालेल्या माणसाने कारखान्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा विचार केला नाही. त्यामुळे भोवतालचे वातावरण दूषित झाले. कारखान्यातील दूषित पाणी नदी- नाले, सागर यात सोडून दिल्यामुळे सर्वच पाणी खराब होऊ लागले. लोकसंख्या अतोनात वाढल्यामुळे माणूस स्वच्छ हवेला वंचित झाला. माणसाने निर्माण केलेल्या आणि उपभोगलेल्या विविध वस्तूचा कचरा इतका वाढला की, सुंदर वसुंधरा ओंगळ झाली. स्वतःसाठी उंच इमारती उभारण्यासाठी माणसाने प्रचंड वृक्षतोड केली. निसर्गाने दिलेल्या पाण्याचा प्रचंड अपव्यय केला. या सर्व गोष्टीचा परिणाम असा झाला आहे की, मानवाला उपलब्ध असलेली निसर्ग साधन संपत्ती हळूहळू संपू लागली आहे. पृथ्वीवरील उष्णता वाढली पावसाचे प्रमाण कमी होऊ लागले. ओझोन वायूचे वातावरणातील प्रमाण घटू लागले.

हवा, पाणी, जमीन यावरील प्रदूषण वाढलं तेव्हा माणूस खडबडून जागा झाला, "वसुधा वाचवा" ही त्याने आरोळी फोडली. ती पण काही दीर्घकाळ चालली नाही. त्याने पुन्हा एकदा आपल्या 'कपटी' स्वभावाप्रमाणे आपल्या कौशल्याच्या जोरावर पर्यावरणाचा वापर केला. त्यामुळे पर्यावरणात अनेक समस्या भेडसावत आहेत. त्या समस्या मानवाला दैनंदिन जीवनात सतत भेडसावत असतात. वायू प्रदूषण, कचऱ्याचे (खराब) व्यवस्थापन, पाण्याची वाढती टंचाई, जमिनीतील पाण्याचे प्रमाण कमी होणे, जलप्रदूषण, जंगलाचे जतन आणि जैव विविधता नष्ट होणे आणि जमीन मातीचा त्रास होणे या मानवाला भेडसावणाऱ्या समस्या आहेत.

मानवाच्या या वृत्तीची अजूनही खंत वाटत आहे. म्हणूनच धरणी- माय रडत आहे. धरणीच्या या विस्कटलेपणाला, पर्यावरण समस्याला कमी अधिक मानव व नैसर्गिक आपत्ती कारणीभूत ठरत आहेत.'

"मी वसुंधरा" धरणी माय
रडते आहे रे धाय मोकलून
फुकटचे मिळाले म्हणून
टाकलेसारे विस्कटून
धरणी माय रडते रे धाय मोकलून
फुकटचे मिळाले म्हणून
टाकलेस रे विस्कटून

# डॉ. रघुनाथ माशेलकर

गुजर समिक्षा संजय, ११ वी सायन्स

माहितीपर



"डॉ. रघुनाथ माशेलकर एक शास्त्रज्ञ, त्यांना देशाविषयी असणारा अभिमान, माय भाषेविषयी असणारी आवड, मातृभाषेबद्दलचे प्रेम व्यक्त करणे साठी......"

मी अकरावी शास्त्र शाखेत शिकत असताना मला अनेक प्रश्न सातत्याने पडायचे ते म्हणजे शास्त्र म्हणजे काय? शास्त्राचा आणि मानवी जीवनाचा संबंध आहे का? शास्त्र शाखेतील प्रयोगाला का महत्व दिले जाते? शास्त्र शाखेतून शास्त्रज्ञच घडणार का? या शास्त्रज्ञांमुळे समाजाला किती फायदा झाला आहे? शास्त्रज्ञ खरोखर समृद्ध जीवन जगू शकतात का? शास्त्रज्ञ हे जगाला सुखी करतात की, दुःखी? इत्यादी वरील सर्व प्रश्नांवर मी सातत्याने विचार करायचे. वाचन करायचे असेच वाचन करताना मला डॉ.रघुनाथ माशेलकर या मराठी शास्त्रज्ञाचे चरित्र वाचनात आले व माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मला मिळाली.



याच मराठी शास्त्रज्ञाची तुम्हालाही ओळख व्हावी, मातृभाषेकडे बघण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलावा आणि यासाठी त्यांची ओळख मी तुम्हाला करून देत आहे. ही ओळख तुम्हाला नक्की आवडेल याची मला खात्री आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर यांचा जीवन परिचय व गुणविशेष खालील प्रमाणे

जन्म : १ जानेवारी १९४३

जन्मगाव : माशेल

निवास : ठाणे

राष्ट्रीयत्व : भारतीय

फिल्ड : रासायनिक अभियांत्रिकी आणि औद्योगिक संशोधन परिषद ग्लोबल रिसर्च अलायन्स

संस्था : केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई

प्रसिद्ध : बौद्धिक मालमत्ता अधिकार, आर. एन. डी. इनोव्हेशन

लक्षवेधी पुरस्कार : पद्मविभूषण, पद्मभूषण, शांतीस्वरूप, भटनागर, वैज्ञानिक दृष्टिकोन संशोधन, गोवर्धनदास, बिर्ला पुरस्कार

साधारणपणे १९५० ते १९६० च्या दशकातील घटना. मुंबईच्या युनियन हायस्कूल या शाळेत घडलेली. शाळा तशी गरीब परिस्थितीतील, पण तिथले शिक्षक मात्र श्रीमंत! मनाने नव्हे तर ज्ञानाने, तिथेच भावे सर पदार्थविज्ञान शिकवायचे. प्रयोग करून अनुभव देणारे व शिकवल्यावर त्यांच्यात विश्वास होता. साबण कसा बनवतात? हे पाठ करून परीक्षेत लिहिलं तर पूर्ण गुण मिळतात, हे माहीत असूनही त्यांनी सर्व मुलांना शिवडीला हिंदुस्थान लिव्हरच्या साबणाचा कारखाना पाहायला नेलं होतं. एकदा बहिर्गोल भिंगाविषयी शिकवताना त्यांनी सर्व मुलांना शाळेबाहेर उन्हात नेलं. भिंग खालीवर करून एक प्रखर बिंदू मिळवला. त्यावर सूर्यकिरणे एकवटविले होते. कागद जळू लागला त्या क्षणी भावे सरांनी आपल्या एका बुद्धिमान विद्यार्थ्याला हाक मारली. 'माशेलकर' तुम्ही ह्या भिंगाप्रमाणे सर्व शक्ती एकवटल्यास जगात काहीही मिळवू शकाल. या घटनेने जीवनात यशस्वी होण्याची गुरुकिल्ली माशेलकरच्या ओंजळीत पडली आणि माशेलकरांसारखा एक प्रतिभावंत वैज्ञानिक भारताच्या ओंजळीत पडला. सूर्यकिरणे समांतर जाऊ दिली तर त्यांच्यामध्ये प्रचंड शक्ती असूनही त्यांना त्यांचा वापर होत नाही. ही शक्ती एकवटली तर मात्र किमया होऊ शकते. हे तत्त्वज्ञान छोट्या रघुनाथांच्या मनात खोलवर रुजले. पुढे माशेलकर सी. एस. आय. आर. चे प्रमुख झाले.

या पदाची सूत्रे हाती घेतली. तेव्हाही त्यांच्या मनात हीच भिंगाची घटना घुटमळत होती. त्यावेळी सी. एस. आय. आर. मध्ये २८,००० लोक कार्यरत होते. देशभर जागोजागी प्रयोगशाळा बसवल्या जात होत्या. परंतु त्या अपेक्षितपणे कार्य करत नव्हत्या. माशेलकरांनी 'व्हिजन' नावाची योजना आखली. ४० प्रयोगशाळांच समांतर चालणं थांबवून त्यांना एका ध्येयाने आणि काम करण्याच्या एका विशिष्ट पद्धतीने बांधले आणि मग त्यातून निर्माण झालं भारतीय वैज्ञानिक संशोधनाचा एक अचाट रूप. एका सृजनशील शिक्षकाने एका विद्यार्थ्याला दिलेल्या गुरुमंत्राने भारताच्या प्रगतीच्या इतिहासात मोलाची कामगिरी घडवली.

रघुनाथ माशेलकरांचा जन्म कोकणातल्या माशेल गावाचा. बालपण मुंबईत गेलं आणि पालिकेच्या शाळेतल्या शिक्षकांनी माशेलकरंच आयुष्य घडवलं. त्यांच्या आई त्यांच्या प्रेरणास्थान. शिवणकाम किंवा मिळेल ते काम करून त्यांच्या आई काही पैसे कमवत असत. एकदा त्या गिरगाव मधल्या काँग्रेस भवनात काम मागण्यासाठी गेल्या. संबंध दिवस तिथे उभे राहून देखील त्यांना काम मिळाले नाही. त्या कामासाठी तिसरी उत्तीर्ण असणं आवश्यक होतं. परंतु त्यांच्या आईचं एवढं शिक्षण नव्हतं. खोटं बोलून त्यांना ते काम मिळवता आलं असतं, पण त्यांनी स्वतः च्याच मनाशी निर्धार केला. आज माझं शिक्षण नाही म्हणून मला काम मिळालं नाही. पण माझ्या मुलाला मी जगातलं सर्वो च्च शिक्षण देईन हा निर्धार पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले. अकरावीच्या परीक्षेत माशेलकर बोर्डात पहिले आले. पण परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण स्वकष्टावर घ्यावे लागले. १९६९ साली मुंबई विद्यापीठाच्या रसायन अभियांत्रिकी विभागाचे तत्कालीन संचालक प्रा.एम. एम. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली.

आयुष्यातील कमीत कमी बारा वर्षे तरी अनवाणी पायांनी चालणारा, सार्वजनिक दिव्याखाली अभ्यास करणारा हा माणूस पुढे इंग्लंडमध्ये जिथे न्यूटनने सही केली आहे, त्या पुस्तकात स्वाक्षरी करणारा पहिला महाराष्ट्रीयन ठरला. डॉ. माशेलकरांचा उल्लेख आला की आठवते ती, त्यांनी जिंकलेली हळद घाटाची लढाई. आपल्याला औषधी हळदीचे गुणधर्म माहीत आहेत. जखम झाल्यावर त्यावर हळद लावण्याचा रामबाण उपाय आपल्या देशात पूर्वापर वापरला जातो. असं असताना एक दिवस सकाळी पेपर वाचत असताना एका विचित्र बातमीने डॉक्टरांचे लक्ष वेधून घेतले. अमेरिकेने हळदीच्या औषधी वापरावर आपले हक्क असल्याचा त्या बातमीत म्हटलं होतं. थोडक्यात अमेरिकेने हळदीचा पेटंट घेतलं होतं. आपल्याकडे अनेक पिढ्या चालत आलेले हे ज्ञान कोणीतरी स्वतःचं असल्याचा दावा राजरोस करतोय हे योग्य नव्हे यावर अमेरिकेशी न्यायालयीन लढाई करून आपले हक्क राखले पाहिजेत असा पक्का विचार करून डॉक्टर कामाला लागले. जोरदार न्यायालयीन लढाई झाली. हळदीचे गुणधर्म जाणणारे संस्कृत श्लोक, पाली भाषेतील संदर्भ अनेक कागदपत्रे जमा करून त्यांनी हळदी घाटाची लढाई जिंकली. त्यातून दोन परिणाम झाले. एक तर आपल्या ज्ञानाचे हक्क आपल्याकडे राहिले आणि (दुसरा दूरगामी फायदा झाला तो म्हणजे पारंपरिक ज्ञानाची किंमत आपल्याला आणि ज्ञानाचे हक्क आपल्याकडे राहिले). अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राला भारतीय ज्ञानाचे महत्त्व कळलं. दुसऱ्याच्या ज्ञानावर आपला हक्क सांगायचं नाही हा धडा मिळाला. हाच प्रकार बासमती तांदळाच्या बाबतही घडला. त्याचंही पेटंट माशेलकरांनी स्वतः परत मिळवले. जगदीश चंद्र बोस यांनी बिनतारी यंत्रणेचा शोध लावला. पण त्यांचे श्रेय मार्कोनीला मिळाले. १९९८ मध्ये बोस यांनी वायरलेस शोधलं होतं. बोस ते बासमती अशा ज्ञानाचा हक्क मिळवण्यात माशेलकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली. औषधापासून खतावरील जीवनोपयोगी रसायनपर्यंत गृहिणींसाठी छोटे उद्योग बसवून देण्यापर्यंत अनेक व्यवसायात माशेलकरांनी मार्गदर्शन केलं आणि आजही करत आहेत. सकारात्मक विचारांचा अनुभव घ्यायचा असेल तर, माशेलकरांबरोबर थोडे क्षण घालवायला हवेत. जर ते शक्य नसेल तर त्यांची पुस्तके वाचावी, भाषण ऐकावे व तुमचा लक्षात येईल की, जगतविख्यात माशेलकर हे एक रचकारात्मक विचारांच्या मुशीतून घडलेलं काही वेगळेच रसायन आहे.

भारताच्या अतिप्रचंड लोकसंख्येबद्दल सर्वांना चिंता वाटते. पण त्याकडे पाहण्याचा माशेलकरांचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. ते म्हणतात भारताची भव्य लोकसंख्या हाच मोठा खजिना आहे. भारतात वैचारिक स्वातंत्र्य आहे. जेवढी माणसं जास्त तेवढ्या नवनवीन कल्पना पुढे येण्यास वाव. त्यातच ५५% पेक्षा जास्त लोक विशीतल्या घरातील आहेत. म्हणजे तरुणांचा देश अनेक नवनवीन धडाडीची कामे करू शकतील. भारताची सांस्कृतिक विविधता देशाला समृद्ध बनवेल. मराठीवर प्रेम करणारे, मायबोलीतून विचार केल्याने मी यशस्वी झाले असे सांगणारे डॉ. माशेलकर आपल्या मराठी युवकांसाठी अवघ्या भारतीयांसाठी स्फूर्ती स्थान ठरते. अशा या थोर मानवसेवी शास्त्रज्ञाला माझे कोटी कोटी प्रणाम!!!

* * *

# मुलीचे आत्मकथन

साक्षी दत्तात्रय कवर, ११ वी सायन्स

आत्मकथन



“ मुली म्हणजे फुलपाखरासारखं त्यांचं जीवन असते. मुलींना स्वातंत्र्य नसते. मुलींच्या जन्मापासून शेवटपर्यंत तिचे स्वातंत्र्य नसते. कुणाच्या न कुणाच्या दबावाखाली तिला वावरावे लागते. मुलगी म्हणून तर जन्माला येणे हा काय गुन्हा आहे का? ”

जेव्हा एक मुलगी जन्माला येते, तेव्हा तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंद त्याचबरोबर तिचे संपूर्ण आयुष्य दिसत असते. एका जन्मलेल्या मुलीच्या जन्मानंतर काही तासातच आई-वडील तिचे संपूर्ण आयुष्य बघत असतात.

मुलगी जन्माला आली त्यानंतर ती जसजशी मोठी होऊ लागते, तेव्हा पहिल्यांदा जेव्हा तिला खेळण्यासाठी खेळणी हवी असतात, तेव्हा तिला बाहुली व भांडीकुंडी हा खेळण्याचा सेट दिला जातो. तिला बॅट बॉल, फुटबॉल, विमान, ट्रॅक्टर अशा वस्तू तिला खेळण्यात दिल्या जात नाहीत, तिला लहानपणापासूनच संसार या जबाबदारीत टाकले जाते. मुलगी चौथी, पाचवीला गेली की, भांडी घास, झाडू मार घरातील इतर कामे दिली जातात. का मुलीला तिचे मन विचारलं जात नाही? हो, पण जशी मुलगी मोठी होऊ लागते, तसं तसं आई-वडिलांचा जीव टांगणीला लागतो. माझी मुलगी शाळेत गेली आहे किंवा बाहेर कुठे गेली आहे तर ती सुरक्षित आहे का? कारण आत्ताच्या या जगात मुलीवर खूप अत्याचार होत आहेत. हा अत्याचार कधी थांबणार? आम्ही मुली कधी सुरक्षित होणार? हाच प्रश्न आमच्या सर्व मुलींच्या मनात आहे.

मुलगी प्राथमिक, माध्यमिक, शिक्षण घेऊन जेव्हा उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यास बाहेर पडते तेव्हा तर आई-वडिलांना झोप पण लागत नसेल की माझी मुलगी कशी आहे? तिची सोबत योग्य मुलींबरोबर आहे का? या आत्ताच्या जगाबरोबर ती चालली आहे का?. कित्येकदा आई मुलीशी मैत्रीण म्हणून बोलत असते. तरी असं मला वाटते मुलीने ही आईबरोबर आपलं मत मनातील सर्व काही बोलावे म्हणजे आई-वडील टेन्शन मुक्त जीवन जगतील असं मला वाटते.

तसं म्हटलं तर स्त्रियांच्या सुरक्षितेचा विचार करताना आणखी एका महत्त्वाच्या समस्येला सामोरे जावे लागते ते म्हणजे मोठ्या मुली किंवा स्त्रियांना जसे बलात्काराचा सामना करावा लागतो, तसेच कितीतरी निष्पाप जीवनात सुद्धा म्हणजेच दोन-तीन वर्षाच्या मुलींना सुद्धा या बलात्काराचा सामना करावा लागतो. या सर्वांमध्ये त्यांची काही चूक नसताना सुद्धा या त्रासाला त्यांना सामोरे जावे लागते. जर एखाद्या मुलीवर किंवा स्त्रीवर अत्याचार झाला तर या जगातील लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन तिच्या विषयी वेगळाच होतो. मग तो पुरुष असो वा एखादी स्त्री तिच्याकडे एका वेगळ्याच नजरेने बघतात असं का? जर तिच्यावर अत्याचार झाला आहे, तर त्या तिची काय चूक होती. जर या समाजाने तिला आपलंसं केले तर ती तिचं आयुष्य आनंदाने जगू शकते. या जगासमोर ती अभिमानाने येऊ शकते.



या सगळ्याचा विचार करत करत एक मुलगी तिचं शिक्षण घेत असते. तिच्याही मनावर खूप मोठे दडपण असतं पण ती बोलण्यास घाबरत असते. कारण बाहेरच्या जगातल्या घडामोडी, जर मी घरी बोलले तर, माझं शिक्षण थांबेल व माझं लवकर लग्न केलं जाईल. म्हणून या सगळ्यापासून स्वतःला वाचवत ती आपलं आयुष्य जगत असते व शिक्षण घेत असते. आता येतो तो दिवस म्हणजे लग्नाचा! आई-वडील आता लग्नाचा विचार करू लागतात .का हो? एक मुलगी शिक्षण

पूर्ण झाल्यावर आपल्या आई-वडिलांजवळ राहू शकत नाही. का हो? समाजाच्या आजपर्यंत चालत आलेल्या परंपरेनुसार 'मुलगी ही परक्याचे धन' असे मानलं जातं व तिचे लग्न केलं जाते. त्यावेळीही पुढचं घर, घरातील माणसं व नेमकं म्हणजे ज्याच्या आधारावर व विश्वासावर आपण त्या मुलीला त्या घरात पाठवणार आहे तो तिचा नवरा तिला समजून घेईल का? या सगळ्याची घालमेल आई-वडिलांच्या मनात असतेच, पण सगळं बघूनच आई-बाबा मुलीचे लग्न लावून देतात. पण म्हणतात तसं तिचं नशीब. लग्नानंतर सासरची परंपरा, त्यांचे मानपान या सगळ्यांची जबाबदारी या सगळ्यात ती तिचं आयुष्य तिचं जगणं विसरूनच जाते. एवढे शिक्षण घेऊन सुद्धा नोकरी करणे शक्य होत नाही. कारण तिच्या डोक्यावर एवढ्या जबाबदाऱ्या असतात जर त्यातून एखादी मुलगी नोकरी करत असेल तर घरातील कामे सर्व जबाबदाऱ्या निभावून तिला कामावर जावं लागतं. हे सगळं करता करता आपले आई-वडील, भाऊ-बहीण, माहेरची सगळी त्यासाठी तिला वेळच मिळत नाही. मुलीच आयुष्य म्हणजे एक बाहुली असते. दुसऱ्याच्या तालावर नाचणारी असते. तिचं असं कोणतच स्वातंत्र्य नसतं. सगळ्यांसाठी मन मारून तिला जगावं लागतं. लग्नानंतर काही वर्षातच घरातील पाहुणे विचारायला सुरुवात करतात. मग काय गोड बातमी देताय की नाही? या सगळ्यात पण ती मुलगी जबाबदार ठरली जाते. तिला जर मुलीचं झाल्या तरीही तिलाच दोष दिला जातो. कधीतरी हा समाज तिच्या नवऱ्याला बोलताना आपण कधी बघितले का हो? का मुलीच्या जन्मापासून ते संसाराच्या प्रवासापर्यंत ती मुलगीच एकटी जबाबदार असते का हो?

का असते मुलीचे जीवन असे? मुलगी म्हणून जन्माला येणे हा एक गुन्हा आहे का? कधी मिळणार मुलीला स्वातंत्र्य. कधी ती बाहेर गेली तर तिचे आई-वडील तिच्या काळजीत राहणार नाहीत. असं हे सगळं कधी होणार? हा मुलीवरचा होणारा अत्याचार कधी थांबणार?.....

# जाणता राजा

**पायल जालिंदर कदम, १२ वी बँकिंग**

जाणता शिवाजी, राजा माझा,

एकच असा होऊन गेला

इतिहासाच्या पानांमध्ये,

नाव आपले कोरून गेला

सह्याद्रीच्या कुशीतून,

एक हिरा चमकला

भगवा टिळा चंदनाचा,

शिवनेरीवर प्रकटला

छाती होती पोलाद ज्यांची,

डोळ्यात ज्यांच्या अंगार,

त्या माझ्या शिवबांचा आज

गर्जा जयजयकार,

गर्जा जयजयकार..!



# आरोग्यदायी जीवनशैलीसाठी पर्यावरण संवर्धन

शिर्के श्रावणी निवृत्ती, ११ वी सायन्स

आत्मकथन



"आरोग्यदायी जीवनशैली शारीरिक, मानसिक, सामाजिक विकास होय. निसर्गाचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे तरच पर्यावरण संवर्धन होईल."

आरोग्यदायी जीवनशैली म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्याची संतुलन साधणारी जीवन पद्धती. मात्र अशी जीवनशैली टिकवण्यासाठी पर्यावरणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. शुद्ध हवा, पिण्यायोग्य पाणी आणि स्वच्छ पर्यावरण आरोग्याचा पाया आहे. मात्र वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि मानवी निष्काळजीपणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे.

निसर्गाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. शुद्ध पर्यावरणाशिवाय आरोग्यदायी जीवनशैलीची कल्पनाही करता येणार नाही. प्रदूषित पर्यावरणामुळे हृदयविकार, फुफुसांचे आजार, कर्करोग, त्वचारोग आणि इतर अनेक गंभीर आजार वाढत आहेत. अशा स्थितीत पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य दिल्यासच आपण निरोगी आयुष्य जगू शकतो.

पर्यावरण संवर्धनाची सुरुवात आपल्या दैनंदिन जीवनातील सवयी बदलून करता येते. उदाहरणार्थ झाडे लावणे आणि त्यांचे रक्षण करणे आज सर्वात प्रभावी उपाय आहे. झाडेही कार्बन-डाय-ऑक्साइड शोषून शुद्ध हवा तयार करतात. त्यामुळे तापमान नियंत्रणात राहते. ग्लोबल वॉर्मिंग कमी होते आणि श्वसनाच्या आजारांना आळा घालता येतो. तसेच, पाण्याची योग्य व्यवस्थापन करून जलसंवर्धन करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने पाण्याचा अपव्यय टाळून शुद्ध पाणी टिकवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.



प्लॅस्टिकचा कमीत कमी वापर हा पर्यावरण संवर्धनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिक प्रदूषणामुळे जमीन, पाणी आणि समुद्राचा ऱ्हास होतो. त्याऐवजी पर्यावरण पूरक साहित्यांचा वापर करणे योग्य ठरते. पुनर्वापर, पुनः विनीयोग आणि कचऱ्याचे व्यवस्थापन सवयी अंगीकारल्या तर पर्यावरणाचे प्रदूषण टाळता येते.

वाहतुकीच्या साधनांमुळे होणारे वायू प्रदर्शन रोखण्यासाठी सायकलचा वापर परत पायी चालणे किंवा सार्वजनिक वाहतूक साधनांचा अवलंब करावा. ही सवय केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर वैयक्तिक आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते. याशिवाय इंधनाचा अपव्यय टाळणे आणि सौरऊर्जा किंवा वाऱ्याच्या ऊर्जे सारख्या स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शहरांमध्ये सध्या निर्माण होणारा कचरा हा आरोग्याला हानिकारक ठरत आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा करून त्यापासून खत तयार करणे. प्लास्टिकचा पुनर्वापर करणे आणि इतर नष्ट न होणाऱ्या वस्तूंचे व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

शहरीकरण आणि औद्योगीकरणामुळे, निर्माण होणारा कचरा हा आरोग्यास हानिकारक आहे. यासाठी कचऱ्याचे व्यवस्थापन घरगुती कचऱ्यापासून खत तयार करणे आणि त्या कचऱ्याचे पुनर्वापर करणे आवश्यक आहे. यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरण स्वच्छ राहील.

मानवी आरोग्यासाठी जैवविविधतेचे महत्व अनन्यसाधारण आहे. निसर्गातील विविध प्रजातींचे अस्तित्व टिकवणे म्हणजे पर्यावरणाचा समतोल राखणे होय. जंगलतोड थांबवणे, वन्यजीवांचे संरक्षण करणे आणि नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरेक वापर टाळणे यामुळे पर्यावरण टिकून राहते.

पर्यावरण संवर्धनाचा फायदा केवळ वर्तमानासाठीच नव्हे तर भविष्यासाठीही होतो. निसर्गाचे संरक्षण म्हणजे पुढील पिढ्यांसाठी शुद्ध पर्यावरणाचा वारसा ठेवणे होय. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिल्यास आपण निरोगी आनंदी आणि संतुलित जीवनशैली अनुभव शकतो.

''निसर्ग वाचवा, जीवन जगा'' या तत्त्वानुसार आपण पर्यावरण संवर्धनासाठी कटिबद्ध झालो, तर आरोग्यदायी जीवनशैलीची गुरुकिल्ली आपल्याला नक्की मिळेल. निसर्गाशी सुसंवाद साधून, टिकाऊ विकासाच्या मार्गाने जाऊन आणि पर्यावरण पूरक सवयी अंगीकारून आपण आरोग्यदायी आणि समृद्ध जीवन जगू शकतो.

# का ते मला कळेना

**साईराज माने, ११ वी सायन्स**

माणसाचा जन्म मिळाला का? ते मला कळेना
आयुष्य हे कसे जगावे ते मला कळेना
वेदनांनी हुंदकयांनी आयुष्य हे दाटलेले
जगण्याचा तरी सोस का? ते मला कळेना
दुःख हे रोजचेच पाचवीला पुजलेले
जगताना तरी का निराश व्हावे ते मला कळेना
पुष्पातून निर्माण होते एकदा या देहाचे ही
शृंगार तरी कसा ते मला कळेना?
राहणार सर्व येथेच जाणार सगळे एकटेच
स्वार्थ तरी संपत्तीचा का ते मला कळेना
माझे तुझे जवळचे नाही कुणी कुणाचे?...
जोडण्याचा छंद नाती सारी का ते मला कळेना?...

अर्थ
जन्माला येऊन मातृभूमीसाठी
काही करणार असाल तर जन्माला अर्थ आहे
जर मातृभूमीसाठी काही करणार नसाल
तर जन्मच व्यर्थ आहे
कोणी ऐकणारे असेल
तर बोलण्यास अर्थ आहे
जर कोणी ऐकणारे नसेल
तर सारे बोलणे ही व्यर्थ आहे.
पुसणार कोणी असेल तर,
डोळे भरून यायला अर्थ आहे.
कोणाचे डोळे भरून येणारच नसतील
तर मरण सुद्धा व्यर्थ आहे.

# शाळा

सानिया पवार, ११ वी सायन्स

अनुभवात्मक



"आपल्या जीवनातील शाळेचे महत्त्व संस्कार कायमस्वरूपी मनावरती कोरले जातात. त्याचा अनुभव वर्णन केला आहे. सहलीचा अनुभव, मजा व शाळेतील दुपार भोजनात भात याची खाण्याची मजा औरच असते."

शाळा म्हणजे मंदिर, शाळा म्हणजे ज्ञान, शाळा म्हणजे संस्कार, शाळा म्हणजे बालपण, शाळा म्हणजे मैत्री, शाळा म्हणजे मस्ती, शाळा म्हणजे एक गोड आठवण. शाळा आपल्याला खूप काही शिकवते जसं की माझी शाळा मी इयत्ता पाचवी ते दहावी सौ सुलोचनाबाई पाटणकर कन्या शाळा, पाटण या शाळेत शिकले. या शाळेने मला खूप काही शिकवले. फक्त शिक्षण नाही दिले तर शिक्षणासोबत संस्कारही दिले. कन्या शाळा म्हणजे मुलींची शाळा आणि मुलींची शाळा म्हटलं तर संस्कार ही आलेच.

प्रत्येक मुलगी ही सर्वगुण संपन्न व्हावी, प्रत्येक क्षेत्रात चमकावी व स्वतःच्या पायावर उभी रहावी हा हेतू ठेवून आमच्या कन्या शाळेत आठवड्यातून एकदा 'बुधवारी' पाककला, शिवणकाम, विणकाम, संगणक हाताळणे/ माहिती या विषयांचे तास व्हायचे. कन्याशाळेची प्रार्थना तर खूपच भारी. एकदा सुरू झाली तर ऐकतच रहावी असं वाटत. सोमवार, मंगळवार मराठीतून बुधवार गुरुवार हिंदीतून व शुक्रवार शनिवार इंग्रजी मधून प्रार्थना व्हायची. पियानो, ट्रिपल, ढोलकी या वाद्यांसोबत मुलींचा गोड/सुरेल आवाजात प्रार्थना व्हायची.

प्रार्थना झाली म्हटलं तर आम्हा मुलींना भीती वाटयची. ती म्हणजे युनिफॉर्मची, वेण्यांच्या बाबतीत तर मध्येच भांग हवा, कोणतीही हेअर स्टाईल नको, शॉर्ट केस असतील तर त्यांनी काळा बेल्ट वापरावा. मोठ्या केसांना काळी रिबीन घालून ती वर टांगलेली हवी. आयडेंटी कार्ड गळ्यात हवं, नखे कापलेली हवी, छोट्या मुलींच्या फ्रॉकला बेल्ट, टॉय हवी. मोठ्या मुलींनी व्यवस्थित पिन करून ओढणी घ्यायची. हा शाळेचा नियमच होता, या मधली एक जरी गोष्ट चुकली तर मग आमचे घाडगे सर काठी घेऊन तयारच असायचे.

शाळेचे दिवस भारी होते, तेव्हा वर्गशिक्षक गैरहजर असल्यामागचे कारण विचारायचे तेव्हा मुलीही ठरलेली कारणे द्यायच्या. कोणाची बस चुकली, कोण आजारी होतं, कोणाचं डोकं दुखतं, तर कोणाचं पोट, कोणाच्या घरी काम असायचं किंवा घरी कोण नव्हतं म्हणून मी थांबलो अशी कारणे ठरलेली होती, दुपारच्या सुट्टीत तर वेगळीच मज्जा. बेल झाली वर्गातून शिक्षक बाहेर गेले की, पळत जाऊन हात धुवून यायचं आणि घरून आणलेला डबा खायचा. मैत्रिणी सोबत गप्पा मारत आणि एकमेकींची भाजी वाटून घेऊन डबा खायचा. डबा खाऊन झालं की मग शाळेतील भात व टोपणात राहिलेली करप घ्यायची व सोबत घरून आणलेली चटणी. आमच्यासाठी फाईव्ह स्टार हॉटेलच्या जेवणापेक्षाही भारी होत.

शाळेत जर सहलीचा विषय निघाला तर आमची नुसतीच लुडबुड, फी किती असेल? चल कुठे-कुठे जाईल? किती दिवसांसाठी जाईल? हे विचार चालायचे. सरांनी सहलीची माहिती दिली की, मग प्रश्न यायचा तो म्हणजे घरचे पाठवतील का? सहलीची पैसे देतील का? पण सगळ्यावर उपाय म्हणजे रडणे. घरचे जर म्हणत असतील जाऊ नको, तर रडायला सुरुवात करायची. जोपर्यंत सहलीला जा असं म्हणत नाही, तोपर्यंत रडायचं. मग घरचे बोलणार जा. पण तुझी मैत्रीण जाणार असेल तरच जा. मैत्रिणीच्या घरी पण हेच बोलायचे आणि मग खोटं घरी सांगायचं की, माझी मैत्रीण जाणार आहे. मला पण जाऊ द्या, तेव्हा कुठे सहलीची फी भेटायची. ती फी सरांना द्यायची आणि सहलीच्या तयारीला लागायचं. सगळ्या मैत्रिणींनी मिळून चर्चा करायची. प्रत्येकीला वेगळे वेगळे पदार्थ डब्यात आणायला सांगायचे. बेकरी, चटपटीत कुरकुरे हे पण वाटून घ्यायचं. कोण कोण काय आणणार? हे ठरवायचं सहलीच्या आदल्या दिवशी तर उद्या सहल आहे हे आठवूण रात्रभर झोपच लागायची नाही. सकाळी आईच्या मागे किरकिर सुरू करायचे. आवर ना, वेळ होईल, बस सुटेल, मला सोडून जातील. सगळे पटपट आवरून

सहलीला सोडायला बाबा सोबत यायचे. बसमध्ये बसवून शिक्षकांशी बोलून बस सुटली की मग ते जायचे. गाण्यांच्या भेंड्या खेळत प्रवास करायला खूप मजा यायची.

पेपरच्या निकाला दिवशी तर जीव खाली वर व्हायचा. आपल्याला किती मार्क पडतील यापेक्षा मी मैत्रिणींच्या पुढे आहे की नाही यातच रस असायचा. खरंतर मी इयत्ता पाचवी पासूनच कन्या शाळेत होते. पण माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचा वर्ग म्हणजे इयत्ता दहावीचा वर्ग. हा वर्ग म्हणजे दहावी शिकत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दोन आव्हाने असायची. एक म्हणजे एसएससी बोर्ड मध्ये चांगले गुण मिळवून चांगलं कॉलेज मिळवायचं आणि दुसरा म्हणजे हे मित्र पाचवीपासून आपल्या सोबत आहेत ते मित्र पुन्हा भेटणार नाहीत म्हणून त्यांच्यासोबत आता वेळ घालवायचा. पण या दोन्ही गोष्टी नीट सांभाळत दहावीही झाली ते कळलच नाही. आता जेव्हा मागे वळून पाहते, तेव्हा चाळीतील काही किस्से, गोष्टी अजूनही तशाच आठवतात. आता फक्त आपल्याजवळ आठवण काढल्याशिवाय काय पर्याय नाही. कारण गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी!

✦ ✦ ✦

# आयुष्य

परीट दीप्ती संदीप, १२ वी कला

कुठे व्यक्त व्हायचं आणि कधी समजून घ्यायचं,
हे कळलं तर आयुष्य भावगीत आहे.
किती ताणायचे आणि कधी नमत घ्यायचं,
हे समजलं तर आयुष्य निसर्ग आहे.
किती आठवायचं आणि किती विसरायचं,
हे जाणलं तर आयुष्य इंद्रधनु आहे.
किती रुसायचे आणि किती हसायचे,
हे ओळखले तर आयुष्य तारांगण आहे.
कसं सतर्क रहायचे आणि पुढे समर्पित व्हायचे,
हे जाणवलं तर आयुष्य नंदनवन आहे.
या सर्व गोष्टीचा समतोल साधता आला तर,
'आयुष्य खूप सुंदर आहे'.

# चहा आणि ती

सारा शशिकांत वसगडेकर, ११ वी सायन्स

मी तुझ्या प्रेमात आहे
आणि तू मात्र चहाच्या
मला आवडेल समुद्र किनारी,
पण तू शोधत असतेस टपरी
निदान चहाच्या निमित्ताने होते आपली भेट
पण विचारता येत नाही मनातलं थेट
साखरेचा गोडवा, आल्याचा तिखटपणा
तुझ्यातही उतरलाय चहापत्तीचा कडकपणा
कसं कळत नाही तुला, मी कितीही सांगितले मांडून
वेळीच नाही उतरवला तर हा चहा जाईल सांडून
माझी नजर तुझ्या ओठांकडे,
तुझी मात्र चहाच्या घोटांकडे
मी तुझ्या प्रेमात आहे
आणि तू मात्र चहाच्या

# पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा

आर्या आनंदा जाधव, ११ वी सायन्स

आत्मकथन



“ पर्यावरण व त्यातील घटक, जीवनामध्ये किती महत्त्वाचे आहेत त्यासाठी सर्वांनी पर्यावरणाचे संरक्षण करणे गरजेचे आहे. ”

पर्यावरण व त्यातील घटक, त्यांच्या समस्या इत्यादीविषयी समाज जागृतीसाठीचे शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय. पर्यावरण शिक्षण या संकल्पनेचा उगम सामाजिक आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय गरजा मधून झाला. पर्यावरण अभ्यास या ज्ञानशाखेचा हा नवा उपक्रम आहे. पर्यावरण संवर्धन हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे. गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, बदललेली उपभोक्ता, वादाकडे झुकणारी जीवनशैली, नैसर्गिक साधनांचा मर्यादेबाहेर उपयोग व मनुष्याची बेफिकीर वृत्ती यामुळे होणारे जल, वायू, ध्वनी, अंतराळ व भूमी इत्यादींचे प्रदूषण आणि इतर अनेक पर्यावरणीय समस्या यांनी जगभर गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे सजीवांचे व पर्यायाने मानवाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पर्यावरणाच्या संरचनेचे, स्वरूपाचे आणि त्याच्या विविध घटकांचे ज्ञान देऊन प्रत्येक व्यक्तीस एक जागरूक व जबाबदार नागरिक बनविणे गरजेचे झाले आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. म्हणूनच शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आज पर्यावरण शिक्षण दिले जात आहे.



पर्यावरण अभ्यासात मनुष्य आणि त्याच्या परिसरास उपयुक्त ठरेल अशा सर्व प्रकारच्या ज्ञानाचा समावेश केला जातो. मानवी जीवनाची गुणवत्ता आणि त्याचे अस्तित्व कायम राखण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना जाणीवपूर्वक राबविण्याची क्षमता नागरिकांमध्ये विद्यार्थी अवस्थेपासून निर्माण करणे हे पर्यावरण शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

पर्यावरण शिक्षणामुळे अध्ययन कृती पर्यावरणाच्या क्षेत्रातील समस्या व आव्हानांची स्वरूप समजून घेऊन त्यांचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी आवश्यक कौशल्य आत्मसात करू शकतो. तसेच पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक सकारात्मक अभिवृत्तींचा मूल्यांचा व पर्यावरण नैतिकतेचा विकास होईल व त्यांना शाश्वत विकासासाठी आवश्यक पर्यावरण संगत कृती जाते. पर्यावरण शिक्षणात खालील घटकांवर अधिक भर दिला आहे.

१) पर्यावरण व पर्यावरणीय आव्हाने या विषयी संवेदनशीलता व जाणीव.
२) पर्यावरण व पर्यावरणाची आव्हाने या विषयांचे आकलन व ज्ञान.
३) पर्यावरणीय गुणवत्ता टिकविण्यासाठीची मदत व त्यासंबंधीच्या वृत्तीत वाढ.
४) पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठीचे कौशल्य.

पर्यावरण शिक्षणाच्या व्यापक संज्ञा पर्यावरणाविषयी लोकजागृती, लोकशिक्षण माहिती व तंत्रज्ञान, प्रसार माध्यमे, छापील माहिती इत्यादींचा समावेश होतो. पर्यावरण शिक्षण हे पारंपरिक तसेच अपारंपरिक शिक्षण आहे. यात बाह्य शिक्षण व प्रायोगिक शिक्षण या पद्धतींचा उपयोग केला जातो. पर्यावरणीय घटक व समस्या याबाबत आधुनिक विचार

प्रणाली व कार्यक्षम दृष्टिकोन विद्यार्थ्यांसह समाजातील सर्व घटकांत रुजवणे हे पर्यावरण शिक्षणाचे ध्येय आहे. निसर्गाविषयी कृतज्ञता, संसाधनांचे संधारण, शाश्वत विकास आणि परिस्थितीकीय संतुलन यासाठी पर्यावरण शिक्षणाची नितांत गरज आहे.

पाणी हा एक सर्व सजीवांसाठी आवश्यक घटक आहे. मानवाच्या शरीरात पाण्याची महत्त्वाची भूमिका असते. एखादा सजीव अन्नाशिवाय काही आठवडे, महिने जीवन जगू शकतो. परंतु पाणी नसेल तर आपण जास्त काळ जिवंत राहू शकणार नाही. माणसाच्या शरीरात असलेली प्रणाली व्यवस्थितपणे कार्यरत ठेवण्यासाठी पाणी हे खूप महत्त्वाचे आहे.



सजीवसृष्टीमध्ये असणाऱ्या प्राणीमात्रांना पिण्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. तसेच शेतीमध्ये असणारी पिके, जंगले आणि विविध प्रकारच्या वनस्पती यांना सुद्धा पाण्याची गरज आहे. माती व खडकांनी बनलेली भूरूपे देखील पाण्यामुळे प्रभावित होतात. एकूणच काय तर पाण्याशिवाय सजीवसृष्टीचे अस्तित्वच नाही. केवळ पाण्यामुळेच प्रभावित होतात. पाण्यामुळेच निसर्गातील सर्व जैविक आणि अजैविक घटकांमध्ये संतुलन राहते; आणि वनस्पती, प्राणी, कीटक, पक्षी या निसर्गातील अन्नसाखळीच्या रक्षणासाठी मदत होते.

आज पाण्याचे सर्व साठे धोक्यात आले आहेत. पाण्याच्या स्त्रोतांमध्ये असणारी पाण्याची पातळी खूप कमी झाली आहे. भूजलपातळी खूप खोलवर गेली आहे. जर आपल्याला पर्यावरणाचे संतुलन राखायचे असेल तर पाण्याचा स्त्रोतांची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी पाण्याचा वापर योग्य रीतीने करणे आवश्यक आहे. म्हणूनच मजल सुरक्षा काळाची गरज हा विषय खूप महत्त्वाचा आहे.

पाणी हे सर्व सजीवसृष्टीसाठी आवश्यक असे संसाधन आहे. येणाऱ्या काळात भारतासह ५० पेक्षा जास्त देशांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागणार आहे.

आपल्या देशामध्ये उपलब्ध होणारे पाणी हे मान्सूनच्या पावसाच्या माध्यमातून उपलब्ध होते. भारतामध्ये सरासरी ११७ सेमी इतका पडतो आणि महाराष्ट्रात १०१ सेमी इतका पडतो. कोकणात पाण्याच्या उपलब्धता ३०० सेमी पेक्षा जास्त असली तरीही सांगली, सातारा, सोलापूर, मराठवाडा या पूर्वीकडील भागात पाण्याची पातळी खूप कमी म्हणजे ५० सेमी इतकी आहे. गडचिरोली, अंबोली या ठिकाणी पावसाळ्यात सर्वात जास्त पाऊस पडतो.

पृथ्वीवर उपलब्ध असलेल्या रत्नांपैकी पाणी हे एक महत्त्वाचे नैसर्गिक संसाधन आहे. सर्व सजीव सृष्टीची निर्मिती ही पाण्यामधूनच झाली आहे. सर्व सजीवांचा जीवनाचा आधार पाणी आहे. मानवाचा इतिहास पाहिला तर ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता मूबलक प्रमाणात आहे, त्या ठिकाणी मानव स्थिरावला आणि त्याच्या विकास ही तेथेच झाला. इजिप्त, हडप्पा यासारख्या विविध प्राचीन संस्कृती यांचा विकास हा नद्यांच्या किनाऱ्यावर झालेला आढळतो. त्यामुळे उपलब्ध असलेल्या पाण्याचा काळजीपूर्वक वापर करणे अत्यंत गरजेचे आहे आणि पाण्याचे संवर्धन करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

म्हणून आजच्या काळात पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा खूप महत्त्वाची आहे.

★ ★ ★

# डोना पोलामागील रहस्य

वसगडेकर सारा शशिकांत, ११ बी सायन्स

आत्मकथन



“‘डोना पोला मागील रहस्य’ ही एक कथा तिच्या जीवनावरील आहे. डोना आणि पोला यांची ही दंतकथा म्हणजे ‘एक दुजे के लिये’ चित्रपटातील कथेसारखी आहे. प्रेमात निष्ठेला महत्त्व असते. म्हणून डोना पोला दगड घेऊन कर्तव्यदक्ष पत्नीचे कार्य करते.”

खूप दिवसांपासून चाललं होतं की, फिरायला कुठे आणि कधी जायचं. पप्पांना सुद्धा कामातून सुट्टी मिळत नव्हती. पण एकदाचा तो दिवस आला २० नोव्हेंबर आणि ते सुद्धा गोव्याला फिरायला जायचं म्हटल्यावर खरेदी सुद्धा आली म्हणून खरेदी केली आणि गोव्यासाठी निघालो. खूप मज्जा येत होती आणि आजरा मार्गाने जाण्याची ठरली. जसं जसं कोकणात आम्ही जात होतो, तसं तसं स्वर्गात आहे की काय वाटत होते. मालवण मध्ये मालवणी जेवायला थांबलो. सावंतवाडी, आंबोली घाट, मालवण काय ते त्यावेळी कळले?



तब्बल सहा ते सात तासाच्या प्रवासानंतर आम्ही गोव्यामध्ये पोहोचलो. हॉटेल मी ऑनलाईन बुक करून ठेवले होते. त्यामुळे शोधायची गरज नाही. पडलेला लोकेशन मॅप लावून हॉटेल आशिष मध्ये पोहोचलो. बागा बीच आणि कळंगुट बीच पासून आमचं हॉटेल पाचशे मीटरच्या अंतरावर होते. थोडा आराम केला आणि संध्याकाळी पहिला पॉईंट कळंगुट बीच पाहिला. गोव्यामध्ये कोणतीही गोष्ट पाहायची असेल आणि स्वतःची गाडी असेल तर माणूस पार्किंगलाच दमणार. तर तिथे बीचच्या बाहेर पार्किंग केली. बीचवर खूप गर्दी होती. कारण आम्ही सीजनमध्ये गेलो होतो. खूप वेळ काय थांबलो नाही. थोडं फोटोशूट करून घेतलं तिथल्या फोटोग्राफर कडून. त्यानंतर आम्ही बागा बीचसाठी निघालो. गोव्यातील सर्वात प्रसिद्ध बीच तिथे आम्ही चीप्स वगैरे खाल्ले. थोडा जास्त वेळ थांबलो आणि तिथल्याच लायटिंग असणाऱ्या डायनिंग टेबलवर जेवलो. गाणी सुद्धा लावली होती. त्यामुळे जास्तच मज्जा येत होती. अशा रीतीने पहिला दिवस संपवला. त्यानंतर पुढील सहा दिवस बेसलिका ऑफ बॉम्ब जीजस, द टॉवर ऑफ संत ऑगस्टटाईन, कलरफुल बिल्डिंग, आगोडा किल्ला, चर्चेस, परा रोड (Parra Road) आणि एक शेवटचा पॉईंट होता डोना पोला. ‘सिंघम’ चित्रपटातील एक क्षण तिथे शूट झाला होता. त्यानंतर वरच्या बाजूला गेलो तर एक जोडप्याचा पुतळा होता. मी माझ्या पालकांना विचारले की, हा पुतळा कोणाचा आणि का आहे? तर म्हणाले की, हे दोघं एकमेकांवर प्रेम करत होते. एवढेच सांगितले. मला जास्त काही सांगितलं नाही म्हणून मी थोडं नेटवर सर्च केलं, तर मला अशी माहिती मिळाली.

डोना आणि पोला ही सामान्यतः स्त्री आणि पुरुषांची नावे मानली जातात. कथा लोकप्रिय संस्कृतीत देखील प्रकट होते. १९८१ च्या ‘एक दुजे के लिये’ या चित्रपटात रती अग्निहोत्रीने तिच्या प्रियकरासह समुद्रात उडी मारण्यापूर्वी दुःखद प्रेम कथा उद्धृत केली. अगदी कथेच्या आवृत्ती प्रमाणे चित्रपटाचा आधार कथेपासून प्रेरित आहे आणि आश्चर्याची गोष्ट नाही की, या दंतकथेला रिलीजननंतर आणखी लोकप्रियता मिळाली.

डोना पोलाभोवती लोकप्रिय कथा आहेत. काही म्हणतात की, ती एक व्यभिचार स्त्री होती. काही म्हणतात, ती एकटी विधवा होती. तिच्याबद्दलची अनेक भुताटकीच्या कथा आहेत. जर शहरी दंत कथेवर विश्वास ठेवायचा असेल तर, चांदण्या रात्री मध्यरात्रीच्या सुमारास डोना पोला मोत्यांची तार घालून समुद्रातून

उगवते आणि दुसरे काहीही नाही. चला आणखी काही लोकप्रिय मिथकांवर एक नजर टाकूया.

**समज क्रमांक एक**

एका कथेनुसार, ती पोर्तुगीज गव्हर्नर तिच्यावर मोहित झाले होते. गव्हर्नरच्या संतप्त पत्नीने तिला मोत्याचा हार (जी तिच्या विश्वासू पतीची भेट होती) वगळता सर्व कपडे काढून टाकले. तिला बांधले आणि कड्यावरुन ढकलले.

**समज क्रमांक दोन**

आणि कदाचित सर्वात लोकप्रिय आवृत्ती डोना पोलाने वर्णन पोर्तुगीज व्हॉइसरायची मुलगी म्हणून करते, जी एका स्थानिक मच्छीमाराच्या प्रेमात पडली होती. त्यावेळी समाजाला त्यांचे प्रेम अस्वीकार्य होते आणि डोना पोलाने आयुष्यात तिच्या प्रियकरापासून विभक्त होण्यावर मृत्यूचा पर्याय निवडला आणि स्वतःला कड्यावरून फेकले.

**समज क्रमांक तीन**

आणखी एक आख्यायिका डोनाकडे निर्देश करते. ज्याने पाउलो या मच्छीमाराशी लग्न केले. एके दिवशी तो समुद्रात गेला आणि परत आलाच नाही. दुर्दैवाने कर्तव्यदक्ष पत्नीने आयुष्यभर कड्यावर त्याची वाट पाहिली आणि तिचे दगड बनले.

**समज क्रमांक चार**

ग्यास्पर डायस, एक कुलीन माणूस देखील तिच्या प्रियकरांपैकी एक मानला जातो. त्याने तिचा विश्वासघात करून दुसऱ्याशी लग्न केल्याचे समजते. हृदयविकार झालेल्या डोना पोलाने कड्यावरून उडी मारली. तिचे भूत रात्रीच्या वेळी कुलीन माणसाला शोधण्यासाठी आणि तिचा बदला घेण्यासाठी दिसते.



★ ★ ★

# सद्यस्थितीतील पर्यावरणीय समस्या

चेतना यशवंत सूर्यवंशी, ११ वी कॉमर्स

वैचारिक लेख



“सद्यस्थितीतील पर्यावरणीय समस्या- जल प्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण. पर्यावरणासाठी भारताची लोकसंख्या कारणीभूत आहे.”

भारतात पर्यावरणाच्या अनेक समस्या आहेत. वायू प्रदूषण, जल प्रदूषण, कचरा, देशांतर्गत प्रतिबंधित वस्तू आणि नैसर्गिक वातावरणाचे प्रदूषण ही भारतापुढील आव्हाने आहेत.

निसर्गाचे ही भारतावर काही गंभीर परिणाम होत आहेत. १९४७ ते १९९५ या काळात परिस्थिती बिकट होती. १९९५ ते २०१० दरम्यान जागतिक बँकेच्या तज्ज्ञांनी गोळा केलेल्या डाटा आणि पर्यावरणीय मूल्यांकनानुसार भारताने आपल्या पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यात आणि जगातील पर्यावरणीय गुणवत्ता सुधारण्यात काही जलद प्रगती केली आहे. मात्र तरीही प्रदूषण हे देशासमोरील मोठे आव्हान आणि संधी आहे.

पर्यावरणीय समस्या हे भारतासाठी रोग, आरोग्य समस्या आणि दीर्घकालीन उपजीविकेवरील परिणामाचे प्राथमिक कारण आहेत.

भारतातील ब्रिटिश राजवटीत पर्यावरणाशी संबंधित अनेक कायदे पाहिले. १९५७ चा किनारा उपद्रव (बॉम्बे आणि कोलकत्ता) कायदा आणि १९५७ चा ओरिएंटल गॅस कंपनी कायदा हे सर्वात सुरुवातीचे होते. १८६० च्या भारतीय दंड संहिता, जो कोणी स्वेच्छेने कोणत्याही सार्वजनिक झरे किंवा जलाशयाचे पाणी खराब करतो, त्याला दंड आकारला. त्याव्यतिरिक्त संहितेने निष्काळजी कृत्यांवर दंड आकारला. ब्रिटिश भारतानेही वायू प्रदूषण नियंत्रित करण्याच्या उद्देशाने ब्रिटिश भारताने कायदे केले. यापैकी प्रमुख म्हणजे १९०५ चा बंगाल स्मोक उपद्रव कायदा आणि १९१२ चा बॉम्बे स्मोक उपद्रव कायदा. हे कायदे अपेक्षित परिणाम घडवून आणण्यात यशस्वी नाही झाले. असे ठरताना, ब्रिटिशांनी लागू केलेल्या कायद्यानी भारतातील पर्यावरणीय नियमांच्या वाढीसाठी पुढाकार घेतला.



ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कोणतीही विशिष्ट घटनात्मक घटनात्मक तरतूद न करता एक संविधान आणि असंख्य ब्रिटिशांनी अंमलात केलेले कायदे स्वीकारले. भारताने १९७६ मध्ये आपल्या संविधानात सुधारणा केली. सुधारित घटनेच्या भाग ४ मधील कलम ४८, वाचा: राज्य पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्यासाठी आणि देशातील जंगले आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करेल. कलम ५१ भारतीय राज्यावर अतिरिक्त पर्यावरणीय आदेश लादले आहेत.

अलीकडील इतिहासातील इतर भारतीय कायद्यांमध्ये १९७४ चा जल(प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९८० चा वन (संवर्धन) कायदा आणि १९ ८१ चा वायु (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा यांचा समावेश होतो. स्टॉक होम परिषदेत घेतलेल्या निर्णयांवरून हवा कायदा प्रेरित झाला. भोपाळ गॅस दुर्घटनेने भारत सरकारला १९८६ चा पर्यावरण (संरक्षण) कायदा लागू करण्यास प्रवृत्त केले. भारताने २००० मध्ये दोन्ही प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियमांचा

संच देखील लागू केला आहे.

१९८५ मध्ये भारत सरकारने पर्यावरण आणि वन मंत्रालयाची स्थापना केली. हे मंत्रालय पर्यावरण संरक्षणाचे नियमन आणि खात्री करण्यासाठी भारतातील केंद्रीय प्रशासकीय संस्था आहे.

भारताच्या केंद्र सरकारने कायदे सक्रिय केले असूनही, पर्यावरणाच्या गुणवत्तेची वास्तविकता १९४७ ते १९९० दरम्यान अधिकतर बिघडली. ग्रामीण भागातील गरिबांना जीवन जगण्याशिवाय पर्याय नव्हता. हवेचे उत्सर्जन वाढले, जलप्रदूषण वाढले, जंगलाचे आच्छादन कमी झाले.

१९९० च्या दशकात सुधारणा सुरू झाल्या. तेव्हापासून, भारतीय इतिहासात प्रथमच प्रत्येक पाच वर्षाच्या कालावधीत प्रमुख वायू प्रदूषक सांद्रता कमी झाली आहे. १९९२ आणि २०१० दरम्यान, उपग्रह डेटाने पुष्टी केली आहे. भारतातील वन्यव्याप्ती प्रथमच चार दशलक्ष हेक्टरपेक्षा जास्त वाढली आहे, ७ टक्के वाढ. ऑगस्ट २०१९ मध्ये, भारत एकेरी वापरल्या जाणाऱ्या भारत सरकारने प्लास्टिकवर देशव्यापी बंदी लादली. जी २ ऑक्टोबर पासून लागू झाली.

काहींनी पर्यावरणीय समस्यांबाबत आर्थिक विकास हे कारण सांगितले आहे. भारताची वाढती लोकसंख्या हे भारताच्या पर्यावरणाच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण आहे असे सुचवले जाते. जपान, इंग्लंड आणि सिंगापूर सारख्या देशांचे प्रायोगिक पुरावे, प्रत्येकाशी लोकसंख्या घनता भारतासारखी आहे किंवा त्याहून अधिक आहे. तरीही प्रत्येक जण भारताच्या तुलनेत अत्यंत उत्सव पर्यावरणीय गुणवत्तेचा आनंद घेत आहे, असे सूचित करते की लोकसंख्येची घनता हा भारताच्या समस्यांवर परिणाम करणारा एकमेव घटक असू शकत नाही.

भारतामध्ये अनेक पर्यावरणीय समस्या आहेत. ज्यामुळे नैसर्गिक संसाधनाचे अवनयन होत आहे आणि लोकांच्या आरोग्यावर, तसेच जीवनावर विपरीत परिणाम होत आहेत.

भारतातील वायुप्रदूषण हे एक गंभीर पर्यावरणीय समस्या आहे. दिल्लीसह अनेक मोठ्या शहरांमध्ये वायू प्रदूषणाची पातळी जगातील सर्वात जास्त आहे. वाहनांचे धूर, औद्योगिक उत्सर्जन, बांधकामाची धूळ आणि कृषी जाळणी यामुळे वायुप्रदूषण होते. याचे परिणाम श्वसनाचे आजार, अस्थमा आणि हृदयविकार यांचे प्रमाण वाढले आहे. लहान मुलांच्या आणि वृद्धांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. जनावरांच्या आणि वनस्पतींच्या जीवनमानावर देखील परिणाम होतो.

भारताच्या अनेक नद्यांमध्ये आणि जलस्त्रोतांमध्ये प्रदूषण पसरले आहे. औद्योगिक कचरा,घरगुती मल-मैला आणि शेतीतील रासायनिक पदार्थ नद्या आणि तळ्यांमध्ये सोडले जातात. ज्यामुळे प्रदूषण होते. याचे परिणाम पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता खालावते. जलजन्य आजारांचे प्रमाण वाढते. मत्स्यपालन आणि इतर जलजीवन प्रभावित होते.

जंगल तोड एक मोठी समस्या आहे. वाढत्या लोकसंख्येच्या आणि शेतीसाठी जमिनीची मागणी वाढल्यामुळे जंगलाचे क्षेत्र कमी होत आहे. याचे परिणाम जैवविविधता कमी होते. हवामानातील बदलांना गती मिळते. स्थानिक समुदायांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम होतो.

भारतामध्ये मातीचा अवनयन होण्याचे प्रमाण वाढत आहे. अतिशय शेतजमिनीचा वापर, रासायनिक खतांचा वापर आणि जंगलतोड यामुळे मातीची गुणवत्ता ही खालावली आहे. त्याचे परिणाम कृषी उत्पादनात घट, अन्न सुरक्षा धोक्यात येते, भूजल पुनर्भरण कमी होते.

जंगलतोड, शिकार आणि मानवी हस्तक्षेपामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. अनेक प्रजातींचे नामशेष होण्याचा धोका आहे. याचे परिणाम, परिसंस्था आणि असंतुलित होते. नैसर्गिक संसाधनावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम होतो.

भारताला हवामान बदलांचा परिणाम जाणवत आहे. अनियमित पाऊस, वाढती उष्णता आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे कृषी उत्पादन आणि जीवनमानावर विपरीत परिणाम होत आहे. याचे परिणाम शेतीत नुकसान, पाणीटंचाई, तटीय भागांमध्ये पातळीचा वाढ.

प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन हे एक मोठे आव्हान आहे. प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे आणि त्याच्या अपघटन न होणाच्या क्षमतेमुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. याचे परिणाम, जलस्त्रोत प्रदूषित होतात, वन्यजीवांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, माती आणि मातीची गुणवत्ता खालावते.

शहरी भागांमध्ये वाढते वाहनांचे आवाज, औद्योगिक क्रियाकलाप आणि इतर मानवी क्रियाकलापामुळे आवाज प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. याचे परिणाम मानसिक तणाव आणि आरोग्य समस्यांचे प्रमाण वाढते. जनावरांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम होतो.

✱ ✱ ✱

# परिचय रायगडाचा

मनिषा भोसले, ११ वी सायन्स

वैचारिक लेख



"रायगड किल्ल्याबद्दलचे प्रेम छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची ओळख समजते. सर्व किल्ल्यामध्ये रायगड ही राजधानी म्हणून ओळखली जाते."

धरतीवरचा स्वर्ग या नावारूपाने प्रसिद्ध असा गड म्हणजे रायगड. स्वर्गाचे दृश्य जिवंतपणे पाहण्याचे ठिकाण जर कोणते असेल; तर ते आहे रायगड. रायगड हा साधारण गड नाही, तो गड म्हणजे मराठ्यांची ओळख आणि छत्रपतींचा सहवास आहे.



पाचाड या ठिकाणापासून एक किलो मीटर असलेला हा किल्ला आहे. त्याच्या पायथ्याशी असलेल्या मचित्त' नावाचा भरभक्कम दरवाजा आपल्याला रायगडावर पाहायला मिळतो. रायगडावर पोहोचण्यासाठी एकूण तीन वाटा आहेत. त्या कोणत्या? तर पहिली वाट म्हणजे चित्त दरवाजा, दुसरी म्हणजे नाणे दरवाजा आणि रोपवे. पण जो आनंद पायी जाण्यात आहे, तो रोपवेणे जाण्यात नाही.

भारतातील महाराष्ट्र राज्यातील अतिशय सुंदर अशा वातावरणात तसेच, भोवतालच्या पानाफुलांनी सुंदरता वाढवलेला हा गड लोकांच्या मनावर राज्य करतो.

रायगड हा महाराष्ट्र राज्यातील कोकण भागातील एक जिल्हा आहे. या रायगड किल्ल्याचे मूळ नाव रायरी. तसेच कुलाबा ही या नावाने रायगड ओळखला जातो.

छत्रपतींनी बनवलेला हा गड मराठी साम्राज्याचे एक राज्य होते. राजांनी इसवी सन १६७४ साली रायगडाला आपली राजधानी बनवली. रायगड हे भावी पिढीचे कर्तव्य आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेला हा गड जबाबदारी म्हणून नव्हे; तर कर्तव्य म्हणून टिकवता आला पाहिजे. ही महाराजांची ओळख आहे ती अनंता पर्यंत टिकली पाहिजे.

यासाठी भावी पिढीला गडाचे महत्व समजणे महत्त्वाचे आहे. कसा बांधला असेल रायगड. समुद्रसपाटीपासून ८२० मीटर म्हणजे २७०० फूट इतक्या उंचीवर आहे. जास्त उंची असल्याने रायगडाला पार करण्यासाठी १४०० पेक्षा जास्त पायऱ्या पार करून घ्यावे लागते. गडावर एकूण ११ तळे आहेत, त्यापैकी एक तळे 'गंगासागर' या नावाने ओळखले जाते. किल्ला पार केल्यावर किल्ल्याच्या वरती एका दरीवर एक प्रसिद्ध असा बुरूज आहे तो म्हणजे 'हिरकणी बुरूज'.

रायगडाने अनुभवलेला महाराजांचा राज्याभिषेक हा ६ जून १६७४ रोजी करण्यात आला. गडावर एकूण सहा राणी महाल आहेत. राजांच्या एकूण आठ पत्नी होत्या. मग दोन राण्या कुठे राहायच्या असा मनामध्ये प्रश्न आला असेल. एक राणी राजगड म्हणजे पुण्याला व दुसरी पत्नी गडाच्या पायथ्याशी असलेल्या राजमाता या वाड्यात आऊसाहेबांच्या सेवेसाठी राहिल्या.

त्यावेळी गडावर ३०० पेक्षा जास्त घरे स्थित होती. जिथे आपल्याला शांती, समाधान मिळते असे महाराजांचे समाधी स्थळ पहायला आपल्याला या किल्ल्यावर मिळते. जगदिश्वर या मंदिराच्या समोर असलेला पूर्वाभिमुख दरवाजा रायगडावरील प्रांगणाचा मुख्य दरवाजा आहे. महत्त्वाचे सांगायचे झाले तर रायगड बांधकाम विभागात प्रमुख असलेले 'हिरोजी इंदुलकर' यांच्या नावाची एक पायरी जगदीश्वराच्या मुख्य दरवाज्याच्या खाली पाहायला मिळते.

पूर्ण रायगड पहायला आपल्याला जवळजवळ तीन दिवस लागतात. अतिशय कल्पकतेने राजांनी हा किल्ला महाराष्ट्रात बांधला. याचा सर्व महाराष्ट्रीयांना अभिमान आहे. पाण्याचे व्यवस्थापनासाठी ८४ पाण्याच्या टाक्या रायगडावर आहेत.

थोडक्यात सांगायचे झाले तर, रायगडाचे वर्णन म्हणजे एक जिवंत वास्तू. अशा या बलाढ्य ऐतिहासिक वास्तूला माझा कोटी कोटी प्रणाम!!

जय हिंद, जय महाराष्ट्र!!

# आयुष्य जगताना

ऋतुजा प्रवीण तांबे, १२ वी सायन्स

वर्णनपर



“‘आपल्या जीवनातील चढ-उतार आयुष्य वर्तमानात जगावे, वर्तमानात लक्ष केंद्रित करावे व आनंदाने जगावे’ कष्ट केल्याशिवाय आनंद मिळत नाही.”

सूर्य सकाळी उगवतो व सायंकाळी मावळतो
पण रात्री चंद्र असतोच ना
तसंच वाईट गोष्टी आठवणीत येतात आणि जातात
दुःख आलं म्हणून खचून जायचं नसतं
आणि सुख आलं की तो क्षण मात्र
मनसोक्त जगून घ्यायचं असतो

चला तर मग पाहूया आज आयुष्याच्या गोष्टी, जीवनाचे धडे. एक छोटस रोपट उगवतं तसंच आपणही चिमुकले आपल्या आईच्या पोटात नऊ महिने राहून या विशाल जगात प्रवेश करतो. कदाचित तोच एक दिवस असावा. या दिवशी आपण रडल्याने आपल्या आई-बाबांना आनंद झाला असेल. पुन्हा काही असे घडत नाही. कलांतराने आपण चालायला, बोलायला, हळूहळू समाजात वावरायला शिकतो. शाळेत जाऊ लागतो. वेळेसोबत आपणही मोठे होतो. खरं तर पुढे गेल्यावर कुठेतरी लहानपणाची उणीव भासते. लहानपण परत हवं-हवंसं वाटतं. पण, ते परत येतं का: तर नक्कीच नाही.

ते आपल्यासाठी ना कधी थांबलेय, ना कधी थांबेल. यामुळे प्रत्येक क्षण हा मोलाचा आहे. वाईट दुःख देणाऱ्या गोष्टी घडतात. खरं आयुष्यात पण त्या मोलाची शिकवण देणाऱ्या असतात. आयुष्य पुन्हा नव्हे त्यामुळे भूतकाळाचा विचार किंवा भविष्याची स्वप्ने बघत बसण्यापेक्षा वर्तमानावरती लक्ष केंद्रित केलं तर, भविष्य निश्चित अविस्मरणीय व स्वप्नपूर्ती सारखे होईल. कारण कोणताच क्षण कोणासाठीही थांबत नाही. त्यामुळे प्रत्येक क्षणात आयुष्याचे सौंदर्य वर्तमानात अनुभवायला शिका.

स्पर्धा म्हटलं की संघर्ष आणि संघर्ष म्हटलं की येते स्पर्धा, पण स्पर्धा ही लोकांसोबत असते का? तर नक्कीच नाही. ती असते स्वतःसोबत, स्वतःच्या भावभावना, विचार यासोबत आणि राहिला प्रश्न संघर्षाचा तर संघर्षाविना यशाची गोडीच काय हो आणि प्रत्येक संघर्षाचा काळ आपल्याला दुःखासोबत प्रत्येक वळणावरती घडवत असतो. या महासागरात कसे टिकून राहायचे याचे धडे देत असतो. ते म्हणतात ना ‘आधी हाताला लागती चटके तवा मिळती भाकर’ अगदी तसेच.

स्पर्धा संघर्ष हे तर आपण करतोच पण त्यासाठी लागणारी वेळ, तो काळ पुन्हा नव्हे तेव्हा प्रत्येक संघर्षाचा काळ भरभरून जगा व वेळेलाही दाखवून द्या. तुम्ही तिच्या परीक्षेत पास झालात. जीवनाचे सौंदर्य घेत असताना महत्त्वाचे असते ते सुख आणि सुख म्हटलं की येतं समाधान. जीवनात मानव तेव्हाच सुखी राहतो, जेव्हा तो समाधानी असतो. नाही तर काय हो कितीही संपत्ती असू द्या माणसाची आणखी मिळवण्याची हाव काही जात नाही. पण हेच जर तो समाधानी असेल तर त्याला रोजची भाकरी सुद्धा आयुष्यात 5 Star जेवणासारखी लागते. आयुष्यात आनंदी असण्यापेक्षा ‘मी समाधानी आहे’ हे खूप महत्त्वाचे आहे.

आयुष्यात कोणतीही गोष्ट घडली तरीही त्याचे वर्चस्व आपल्यावर दिसता कामा नये तेव्हा ती व्यक्ती आयुष्यात कुठेही हारत नाही व ती व्यक्ती जगत जगत आपले आयुष्य घडवत जाऊ. जीवन हे निसर्गाने दिलेली देणगी आहे. त्यामुळे कोण काय बोलते, यामुळे तुम्ही हताश होऊ नका. कारण हा अनमोल जन्म पुन्हा नव्हे. तेव्हा या मिळालेल्या जीवनदानात तुम्हाला काय करायचे आहे हे तुमच्या विचारावरती अवलंबून आहे व हेच विचार व तुमचे कष्ट, तुमचे कर्तृत्व तुम्ही गेल्यानंतरही अभिमानाने सांगतील. तुमचे आयुष्य हे तुमच्या हातात आहे. तेव्हा काय करायचे हे तुम्हीच ठरवू शकता.

✖ ✖ ✖

# हिंदी विभाग



असफलता एक चुनौती है, इसे स्वीकार करो
क्या कमी रह गयी, देखो और सुधार करो
जब तक न सफल हो, नींद चैन को त्यागो तुम
संघर्ष का मैदान छोडकर मत भागो तुम
कुछ किये बिना ही जय- जयकार नही होती
कोशिश करने वालों की कभी हार नही होती।

हरिवंशराय बच्चन

**– विभागीय संपादक –**

**कु. अर्चना साळुंखे**

# अनुक्रमणिका

## गद्य



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाटण तालुके को मिला पर्यटन स्थलों का वरदान | दीक्षा दिगंबर कदम | ११ वीं कला | भौगोलिक जानकारीपर लेख | ४१ |
| २ | जिंदगी एक निःशब्द सफर | गोतपागर समीक्षा राहुल | १२ वीं कला | वैचारिक लेख | ४५ |
| ३ | आज के वैज्ञानिक युग में नौकरी का सही अवसर : बीसीए कोर्स | जान्हवी जगन्नाथ वीर | बी.सी.ए. ३ | तकनीकी जानकारीपर | ४७ |



## पद्य



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जिंदगी | पायल जालिंदर कदम | १२ वीं बँकिंग | ४६ |
| २ | बेटियाँ | रेश्मा रामचंद्र यादव | १२ वीं कला | ४६ |
| ३ | चार दिन की जिंदगी | मानसी किरण शिंदे | १२ वीं कला | ४८ |

# पाटण तालुके को मिला पर्यटन स्थलों का वरदान

दीक्षा दिगंबर कदम, ११ वीं कला

भौगोलिक जानकारीपर लेख



पाटण तालुका सातारा जिले में स्थित महत्वपूर्ण तालुका है। पाटण तालुका सातारा जिले में पश्चिम की ओर सह्याद्री पर्वत शृंखला में स्थित दुर्गम भाग है। प्राकृतिक सौंदर्य का वरदान मिला यह पाटण तालुका पर्यटन स्थानों से भरा है। पाटण तालुके में महाराष्ट्र का प्रसिद्ध कोयना बांध जो बिजली उत्पादन क्षमता के कारण कोयना नदी को महाराष्ट्र की जीवनरेखा माना जाता है। पाटण तालुके में हमें कुदरत की प्राकृतिक सौंदर्य का नजारा देखने को मिलता है। जैसे चाफल का श्रीराम मंदिर, वाल्मिकी मंदिर, नाईकबा मंदिर, धारेश्वर मंदिर, दातेगड किला, के टू पॉईंट, शिवसागर जलाशय, वासोटा किला ये सब पर्यटन स्थल पाटण तालुके में देखने को मिलते है। इस प्रकार सह्याद्री पर्वत शृंखला में बसे हुए पाटण तालुके को प्राकृतिक सौंदर्य का वरदान प्राप्त हुआ है।

**के टू पॉईंट (काठी अवसरी)-**

हिमालय पर्वत की तरह फैली काठी अवसरी यही पर सह्याद्री पर्वत शृंखला बीच में दिखाई देने वाला कोयना बांध शिवसागर जलाशय अथांग फैला हुआ है। इस पानी में सह्याद्री पर्वत शृंखला पर दिखाई देनेवाला वनराई का प्रतिबिंब मतलब हिमालय पर्वत का काश्मीर है। काठी अवसरी के टू पॉईंट की ओर जाते समय सह्याद्री पर्वत पर फैला हुआ आशिया खंड का सबसे बड़ा पवन ऊर्जा प्रकल्प और हवा का जोरदार प्रवाह के कारण यहाँ का वातावरण बड़ा ही ठंडा महसूस होता है। पर्यटक शिवसागर से तपोला होते हुए महाबलेश्वर जा सकेंगे। पर्यटकों के लिये गेस्ट हाऊस बनाया गया है। श्याम के सुरज को जलाशय के साथ हरे घने जंगल के दृश्यों में पहाड़ो के पीछे छुपते हुए देखेंगे तो, यह भूमी स्वर्ग से अधिक सुंदर महसूस कर सकते है।



**दातेगड**

पाटण तालुका में टोळेवाडी गाँव में यह किला दातेगड अथवा सुंदरगड नाम से प्रसिद्ध हैं। एक गिरिदुर्ग है, यह किला चढ़ाई के लिए जादा कठीण नहीं हैं। इसकी ऊंचाई १०२७ मीटर हैं। चारों ओर से प्राकृतिक काले रंग की तटबंदी के साथ इस दुर्ग की विशेषता है कि, ज्यादा से ज्यादा मूर्तियाँ पत्थर को ही आकार देकर बनवाई गई है।



दातेगड को देखने के लिए पाटण इस तालुके से चाफोली रास्ते से १५ मिनट चलने के बाद दाई ओर लाल मिट्टी से बनी पगडंडी दातेगड के पर्वतरांगा से मिलती है। १५ वें शतक में दाते गड पर शिर्के का कब्जा था। मलिक उत्तुजारने शिर्के का पराभव करके किला बहामनी राज्य में शामिल किया। बहामनी राज्य टुकड़ो में बट जाने के बाद यह किला आदिलशहा के कब्जे में आ गया। १५७२ में पाटणकर घराणे को इस किले की देशमुखी मिली थी। अफजलखान का वध करने के बाद छत्रपती शिवाजी महाराज जी ने यह किला जीत लिया और किले की जिम्मेदारी साळुंके नामक सरदार के हाथ पर सौंप दी।

सन १६८९ में मराठे ने यह किला जीत लिया। उस समय संताजी और पाटणकरजी ने किये हुए पराक्रम के लिए छत्रपती

राजाराम महाराजजी ने उन्हें पाटण भाग में उदगाँव भेंट के रूप में दिया। सन १७४५ में पेशवे और तुलाजी आंग्रे इन दोनों में विवाद हुआ । आंग्रे ने दातेगड को बंदी बनाया। किला जितने की कोशिश की। लेकिन उन्हें यह किला जितने में कामयाबी नही मिली। दातेगड को छ. शिवाजी महाराज जी के समय 'सुंदरगड' ऐसा ही नाम था। दातेगड पर जो कुँआ और पत्थरों से बना हुआ शिल्प शिवपूर्व काल का लगता है। कुछ समय के बाद यह किला मोगलों के कब्जे में चला गया। सन १८१८ में कॅप्टन ग्रॅट ने यह किला न युद्ध करके जीत लिया।

दातेगड़ पर पश्चिम तट की ओर ६६ फीट ऊंची की गणेशजी की मूर्ति है और उस मूर्ति के कान गुड़हल के फूल के तरह बनवाए गए हैं। इसी मूर्ति के पास ही १० फीट ऊंची हनुमान जी की मूर्ति है। ३० मीटर गहरी पत्थर में खोदी गई तलवार के आकार का कुआँ है। उसी कुऐं में पानी के बाजू में पत्थरों में बना महादेवजी का मंदिर है। इस मंदिर में शिवलिंग और नक्षी काम किया हुआ नंदी है। तलवार के आकार का कुआँ यह इस दातेगड की विशेषता है। गड के बाजू में जो कटिबंध है, वह अभी भी मजबूत स्थिति में है।

**रिवर्स वॉटरफॉल**

रिवर्स वॉटरफॉल पाटण तालुका में सड़ा वाघापुर में रिवर्स वॉटरफॉल का बहुत ही सुंदर प्राकृतिक नजारा है। इस प्राकृतिक सौंदर्य को देखने के लिए दूर-दूर से काफी लोग आते हैं। यह एक ऐसा सुंदर झरना है। यहाँ पानी नीचे की तरफ नहीं बल्कि ऊपर की तरफ उछलता है। यहाँ तेजी से बहनेवाली हवा, ज्यादा बारिश होती है। हवा के विरुद्ध दिशा की ओर से बहने वाला यह झरना बहुत अच्छा है। यह पाटण तालुके को मिली एक प्राकृतिक देन है।



**कोयना बांध**

भारत के महाराष्ट्र राज्य के सातारा जिले में पाटण तालुके में कोयना नदी पर एक बांध है। यह महाराष्ट्र के सबसे बड़े बांधों में से एक है। बांध के पीछे बड़ा जलाशय बनाया गया है। उसे शिवसागर सरोवर के नाम से जाना जाता है। कोयना बांध की ऊंचाई १०३.२ मी (३३९ फीट), लंबाई ८०७.२ मी (२६४८ फीट) है। यह पश्चिमी घाट में चिपळुण और कराड के बीच राजमार्ग पर स्थित है। कोयना बांध कोयना नदी पर बनाया गया एक मलबा कंक्रीट बांध है । कोयना नदी सहयाद्री पर्वत श्रृंखलाओं के एक हिल-स्टेशन महाबळेश्वर से निकलती है।



कोयना बांध पर कार्य १९५१ शुरू किया गया था। बांध का मुख्य उद्देश पडोसी क्षेत्रों में सिंचाई सुविधाओं के साथ जलविद्युत की आपूर्ती करना है। मान्सून के मौसम के दौरान बाढ़नियंत्रण में महत्त्वपूर्ण भूमिका निभाता हैं। जलग्रहण क्षेत्र कोयना नदी को शिवसागर झील से जोड़ता है। जिसकी लंबाई लगभग ५० किलोमीटर है।

कोयना वन्यजीव अभयारण्य जो कि लगभग ४२३५५ वर्ग किमी. क्षेत्र को कव्हर करता है। सन १९८५ मे अधिसूचित किया गया था। २००७ मे चांदोली राष्ट्रीय उद्यान के साथ कोयना वन्यजीव अभयारण्य को राष्ट्रीय बाघ संरक्षण प्राधिकरण द्वारा सह्याद्री टाइगर रिझर्व के एक हिस्से के रूप में घोषित किया गया था।

कोयना बांध भारत की कोयना जलविद्युत परियोजना महाराष्ट्र राज्य विद्युत बोर्ड द्वारा संचलित है। कोयना बांध १०५ टीएमसी की जल भंडारण क्षमता के साथ सातारा क्षेत्र की जीवन रेखा माना जाता है। कोयना नदी पर निर्मित एक प्रकार का खुरदुरा, कंक्रीट बांध है। कोयना जलविद्युतसंयंत्र परियोजना भारत के सबसे बड़े जलविद्युतसंयंत्रों में से एक है। इसमें विद्युत उत्पादन के चार चरण शामिल है। परियोजना की कुल क्षमता १९६० मेगावॅट है। सभी जनरेटर पश्चिमी घाट के पहाड़ों के अंदर गहरे खोदे गये भूमिगत बिजलीघरो में स्थित है। २० वीं सदी की शुरुवात में कोयना नदी का एक संभावित जल-विद्युत

स्त्रोत के रूप में सर्वेक्षण किया गया था। बिजली उत्पादन क्षमता के कारण कोयना नदी को महाराष्ट्र की जीवन रेखा माना जाता है।

**धारेश्वर**

यह धारेश्वर शिवलिंग मंदिर महाराष्ट्र राज्य के पाटण तालुका में स्थित है। यह मंदिर पहाड़ों से बहने वाली झरने के नीचे है। धारेश्वर मंदिर यह एक कुदरत का प्राकृतिक करिश्मा है। धारेश्वर मंदिर में शिवलिंग काले रंग के विशेष चमकीले पाषाण से बना हुआ है। धारेश्वर महादेव मंदिर में प्रतिवर्ष सावन के महीने में



काफी लोगों का आना-जाना रहता है। यह मंदिर पाटण में दिवशी गाँव में है। यह एक निसर्गरम्य पर्यटन स्थळ है। यह ऐसी जगह है, जहाँ हर रोज मंदिर पर पानी गिरता रहता है। पाटण से इस १७ किलोमीटर दूरी पर उत्तर सह्याद्री पर्वत रांगा में श्रीराम काल में खुदाई की गई गुफा में श्रीराम मंदिर और शंकर महादेवजी का पवित्र स्थान है। यह गुंफा २०० फीट लंबी ३५ फीट रुंद और फीट ऊँचाई हैं। यह स्थान धार्मिक क्षेत्र में रूप प्रसिद्ध है। श्रीराम और पांडवो के पदस्पर्श से पावन यह तीर्थक्षेत्र के स्थान पर दिवाली के समय यात्रा होती है। यहाँ की काठीपालखी मिरवणूक यात्रा की विशेषता मानी जाती है। यहाँ से कुछ दूरी पर पवनचक्की प्रकल्प दातेगड यह पर्यटन स्थल है।

**ओझर्डे वॉटर फॉल**

सातारा जिले के पाटण तालुका में ओझर्डे झरना आपको रुपये और खर्च किये गये समय का मूल्य देता है। ७८० फिट से



अधिक उँचाई से छलांग लगाता यह झरना एक या दो तीन की यात्रा के लिए, कोयना बांध मे नौकायन और अन्य अनुभवों के लिए उत्कृष्ट स्थान है। ओझर्डे या नवजा झरना यह कुदरत का नजारा है। झरने के पानी के आवाज की गर्जना आप काफी दूर तक सुन सकते है। झरने तक पहुँचने के लिये आपको लगभग एक किलोमीटर का छोटासा ट्रेक पूरा करना होगा। यह ट्रेक मार्ग घने जंगल से होकर गुजरता है। आप झरने के बहने वाले विशाल जलप्रवाह के कारण उत्पन्न धुंध को देख सकते है। ओझर्डे झरना शक्तिशाली कोयना बांध के बगल में है। जो भारत की सबसे बडी जलविद्युत परियोजना में से एक है। बांध के कारण एक बॅकवॉटर झील बन गई है, जिसे शिवसागर झील के नाम से जाना जाता है। ओझर्डे वॉटर फॉल पाटण तालुके का आकर्षक पर्यटन स्थळ है।

**चाफळ का श्रीराम मंदिर**

पाटण से उंब्रज यात्रा करते समय सातारा जिले में पाटण तालुके का एक राजकीय दृष्टिकोन से महत्वपूर्ण चाफळ गाँव है। यह गाव मांड नामक नदी किनारे बसा हुआ है। यह चाफळ का श्रीराम मंदिर ४०० साल पुराना है। संत समर्थ रामदास स्वामीजी ने बनवाया था। कहानी के अनुसार समर्थ रामदास



स्वामी को श्रीरामजी ने सपने में दर्शन दिये और कहा कि वे पास के अंगापूर नामक, गाँव में झील से भगवान श्रीराम की मूर्ति ढुंढें। समर्थ रामदासजी ने झील से मूर्ति निकाली और १६४८ में गाँववालों की मदद से चाफळ में भगवान श्रीरामजी का एक मंदिर बनवाया। शिवकालीन इतिहास का सबूत देनेवाला मंदिर है। यह मंदिर भाविकों का श्रद्धास्थान है। श्रीराम मंदिर के सामने 'दास मारुती' का मंदिर समर्थ रामदास स्वामीजी ने स्थापन किया है।

मंदिर का परिसर बहुत ही बड़ा है। मंदिर में राम-लक्ष्मण और सीताजी की मूर्तीयाँ है। मंदिर में एक ध्यान गुफा है।

**शिवसागर सरोवर**

भारत के महाराष्ट्र राज्य के सातारा जिले में एक कृत्रिम जलाशय है। यह ५० किलोमीटर लंबा, ८० मीटर (२६० फीट) गहरा जलाशय कोयना नदीपर कोयना बांध के निर्माण से बना है। इसका नाम छत्रपती शिवाजी महाराजजी के नाम पर रखा गया था।

**रामघळ तीर्थस्थान**

पाटण तालुका मेंस्थित सडा दाढोली के पास शिवकालीन रामघळ है। पवनचक्की का परिसर हमें बारिश में बहुत अच्छा लगता है। मंदिर में पहुँचाने के लिये सीढ़ियाँ तैयार की गई। बाघ का शिल्पचित्र वहाँ दिखाई देता है। छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी समर्थ रामदास स्वामीजी की मूर्ती हमें दिखाई देती है। प्राचीन काल मे जांभा पत्थरसे बनाया गया मंदिर है। छत्रपती शिवाजी महाराज और रामदास स्वामीजी की पहली मुलाकात इसी जगह पर हुई है।

**वासोटा किल्ला**

महाराष्ट्र के सातारा जिले में स्थित जिसकी लंबाई ४२६४ फुट लंबी है। इसका प्रकार वनदुर्ग स्वरूप का है। वासोटा वशिष्ठ ऋषि के जगत से है। वशिष्ठ ऋषि के शिष्य अगस्त ऋषि जब दक्षिण भाग में आए तो कोयना के शिखर पर रह रहे थे। उन्होंने ही उस शिखर को अपने गुरु का नाम दिया। सालो बाद पर्वत पर बुरुज बांधकर लष्करों का स्थान बन गया। बाद में इस पर्वत का नाम वशिष्ठ से वासोटा हो गया। वासोटा का मतलब ज्ञानेश्वरी ग्रंथ में विश्राम स्थान बताया गया है। वासोटा के बारे में पेशवाई में भी लिखित है। छत्रपति शिवाजी महाराजजी ने जावली



जितने के बाद आसपास के सभी किले जीत लिए। लेकिन वासोटा किला अधिक दूर होने के कारण नहीं जीत पाए। फिर भी अफजलखान के वध के बाद मोहिम की पर जीत नहीं पाए। जून १६६० को छत्रपति शिवाजी महाराजजी ने वासोटा किला जीत लिया। वासोटा किले का इलाका जंगली और दुर्गम होने के कारण, कैदियों को कैद करने के लिए इस्तेमाल किया गया था। पहले यहाँ जंगल होने के कारण काफी जंगली जानवर दिखाई देते थे। इसी कारण छत्रपति शिवाजी महाराजजी ने वासोटा किले का नाम हुआ व्याघ्रगड़ कर दिया।

**वाल्मीकि मंदिर**

वाल्मीकि ऋषिजी की तपोभूमि पाटण तालुके में है। यह पर्यटक की दृष्टि से भाग्य की बात है। चांदोली अभयारण्य के पास श्री तीर्थक्षेत्र वाल्मिक यह स्थान पर्यटक केंद्र के रूप में प्रसिद्ध है। इसी जंगल में वाल्मीकि ऋषि निरपराध लोगों की जान लेता था। तब वहाँ नारदमुनिजी ने वाल्मीकि ऋषि को अपने पाप से मुक्त होने के लिए राम नाम का मंत्र दिया। यह मंत्र का जाप वाल्मिक ऋषि ने १२ साल तक करते रहे। तब उनके शरीर पर वारुल तैयार हो गया।

यह स्थान वाल्मिक तीर्थक्षेत्र के रूप में पहचाना जाता है। वाल्मीकि मंदिर के पीछे ५० मीटर के दूरी पर वांग नदी का उगम स्थान है। मंदिर के पश्चिम की ओर चांदोली अभयारण्य में १५ मिनट पैदल चलने के बाद जिस जगह पर वाल्मिक ऋषिजी ने रामायण लिखा, वह केतकीबन पत्थर हमें दिखाई देता है। मंदिर के पीछे संत चोखोबा मंदिर है और उसके सामने समाधि स्थल है। वाल्मीकि इस जगह पर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडल की ओर से पर्यटक की रहने की सुविधा उपलब्ध है।

इसी प्रकार भारत के महाराष्ट्र राज्य में पश्चिमी घाट पर्वतमाला में स्थित एक पहाड़ी दर्रा है। इसमें से चिपळुण-कराड राजमार्ग गुजरता है। जो सातारा जिले और रत्नागिरी जिले को जोड़ता है। कुम्भार्ली घाट इस पहाड़ी दर्रा का नाम है। उसकी ऊँचाई ६२५ मी (२०२१ फीट) इतनी है।

सातारा जिले में स्थित पाटन तालुका प्रकृति का एक अद्भूत एवं अद्वितीय संसाधन है। मान्सून के मौसम में हरीभरी प्रकृति में सैकड़ो झरनों का घर बनने वाले इस तालुका में भारी बारिश, कोयना बांध, बड़े-बड़े झरनों के साथ हरीभरी प्रकृति का आनंद लेने के लिए हजारों पर्यटक आते रहते हैं।

⁂

# जिंदगी एक नि:शब्द सफर

गोतपागर समीक्षा राहुल, १२ वीं कला

वैचारिक लेख



“जिंदगी का सफर बहुत कठिन होता है, क्योंकि आगे की जिंदगी हमें दिखाई नहीं देती। जिंदगी एक अनोखा सफर है। किसी न किसी मुकाम को हासिल करने के लिए हम प्रत्येक क्षण सफर के दौर से गुजरते हैं। हमें सिर्फ आज ही दिखाई देता है कल क्या होगा? परसो क्या होगा? हमारी जिंदगी में यह हमें मालूम नहीं होता है। जिंदगी को इस तरह जीना चाहिए कि वह बोझ न लगे प्रत्येक दिन कुछ अच्छा, कुछ नया करने की सोच के साथ दिन की शुरुआत करनी चाहिए। जिंदगी को ऐसे जीना चाहिए कि, लोगों के लिए हम एक मिसाल कायम कर सके। दूसरों के लिए प्रेरणा का स्त्रोत बने। जिंदगी जीना एक कला है। अगर खुशी से जिंदगी ना जिओ तो जिंदगी नीरस हो जाती है।”

वैसा देखा जाए तो, जिंदगी एक यात्रा की तरह होती है। यह यात्रा हर व्यक्ति को करनी ही पड़ती है। बचपन से ही हम यह जिंदगी की यात्रा करते आ रहे हैं। इस यात्रा में हर दिन अलग-अलग मोड़ आते है। इस यात्रा की सच्चाई यह है कि, हर किसी की यात्रा अलग-अलग होती है। किसी के लिए ये सफर कठिन होता है, तो किसी के लिए बेहद मजेदार होता है।

कुछ लोग इस जिंदगी के सफ़र से ईर्ष्या करते हैं, तो कुछ लोगों के लिए जिंदगी बोझ बन जाती है। लेकिन उसकी मजा तब आता है, जब जीवन के इस यात्रा में नए रास्ते मिल जाते हैं। अजीब धाराएँ मिलती है, नए लोग आते हैं और उसी रास्ते पर चलते हुए हमसे जुड़ते हैं। इस जिंदगी के यात्रा के दौरान व्यक्ति बहुत कुछ सीखता है, नई-नई चीजों का अनुभव करता है और इस तरह जीवन के एक पड़ाव पर पहुँचकर व्यक्ति जीवन में आगे बढ़ता है। कुछ लोग जिंदगी जीने की खुशी नहीं लेते, तो कुछ लोग जिंदगी में आने वाले उतार-चढ़ाव को साथ लेकर जीवन में आगे बढ़ते हैं। कदम-कदम पर कठिनाईयों का सामना करते-करते जिंदगी का सफर आगे कब आगे बढ़कर रफ्तार पकड़ लेता है, इसका पता ही नहीं चलता। ऐसा लगता है कि, एक पल में पूरी जिंदगी गुजर गई।

कभी ऐसा लगता है कि, इस जीवन के पूरे सफर में हम जीना ही भूल गए। कई इच्छाऐं और आकांक्षाऐं अधूरी रह जाती है। कई सवालों के जवाब मिलना बाकी है, कहीं बातें रहस्य बनकर रह गई है। ऐसा महसूस होता है कि, जैसे कम समय में बहुत जीना चाहिए। यहाँ तक की समय के पहले पीछे घूमकर वापस जाकर फिर से जीवन जीना चाहिए। लेकिन एक बात तो संभव है जिंदगी के किसी भी पड़ाव पर हर पल को खुशी के साथ जीने का फैसला कर ले कि, जिंदगी बहुत- ही खूबसूरत है। जिंदगी से बिना कोई अपेक्षा किया हर खूबसूरत पल का आनंद लेते हुए जिए तो जिंदगी बेहद खूबसूरत बन जाती है।

जीवन में सकारात्मक लोगों के साथ रहना चाहिए। हमेशा दूसरों से कुछ सीखने की जिज्ञासा होनी चाहिए दूसरों का सम्मान करना चाहिए। सभी के साथ प्यार से रहना चाहिए। यहीं जीवन जीने का सही तरीका है। इस तरह हम अपनी जिंदगी जियेंगे तो हमारी जिंदगी का हर पल खुशी से भर जाएगा।

मनुष्य का जीवन एक सफर की तरह होता है। पर मनुष्य का जीवन किसी न किसी संघर्ष से भरा होता है। यदि हम संघर्ष का सामना करते हुए आगे बढ़ते है, तो हमें जीवन में बहुत कुछ सीखने को मिलता है। जिंदगी में हमारे साथ ऐसी बहुत-सी घटनाऐं होती है। हमेशा सोचते हैं कि यह सब मेरे साथ ही होना था। हमारी जिंदगी का हर एक सपना पूरा नहीं होता तो हमें दुख होता है। इसलिए हमें जिंदगी में जो मिलता है उसी में खुश रहकर कुछ बातों को भूलकर जीवन में आगे बढ़ना चाहिए। अगर हम जीवन में सकारात्मक रहेंगे तो हमारे निर्णय, विचार और जीने में सकारात्मकता निकलकर आती है और हमारा जीवन खुशी से भर जाता है।



